दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –२५ | बुधवार, दि.०१ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-25 | Wednesday, Dt.01 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# ओला दुष्काळ जाहीर करण्यास मुख्यमंत्री फडणवीसांचा नकार; पण सर्व सवलती लागू

## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन

### मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला सर्वाधिक फटका

मराठवाड्यातील लातूर, बीड, नांदेड, परभणी, धाराशिव, जालना, संभाजीनगर आणि पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. लाखो हेक्टरवरील खरीप पिके पाण्यात गेल्याने रब्बी हंगामही धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.



महाराष्ट्रात गेल्या पंधरवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, राज्यातील तब्बल ६० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर मोठी घोषणा केली आहे.

महाराष्ट्रात गेल्या पंधरवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, राज्यातील तब्बल ६० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर मोठी घोषणा केली आहे. त्यांनी सांगितले की, ओला दुष्काळ जाहीर होणार नाही, पण सर्व सवलती लागू होतील. बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी थेट बँक खात्यात मदतीची रक्कम जमा केली जाईल.

ओला दुष्काळ जाहीर नाही, पण सर्व सवलती लागू

विरोधकांकडून 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी होत होती. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की अधिकृत नियमावलीत अशा प्रकारची संकल्पनाच नाही. तरीदेखील, दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती आणि सुविधा पूरग्रस्त व पावसामुळे बाधित शेतकऱ्यांनाही लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### शेतकऱ्यांना कर्ज वसुलीची नोटीस?

अनेक शेतकरी पुर आणि अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेले असताना बँकांकडून कर्ज वसुलीच्या नोटिसा दिल्या जात असल्याची माहिती पुढे आली होती. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की या नोटिसा जुन्या कर्जांसाठी आहेत. मात्र, बँकांना कर्ज वसुलीची कारवाई थांबवण्याचे आदेश देण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

दोन-तीन दिवसांत नुकसानीचा अंतिम अहवाल

अजूनही अनेक ठिकाणी पाणी साचलेले असल्याने नुकसानीचे संपूर्ण मूल्यांकन होऊ शकलेले नाही. पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण अहवाल तयार केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार एक संपूर्ण धोरण जाहीर करेल आणि केंद्र सरकारकडे मदत पॅकेजसाठी प्रस्ताव पाठवला जाईल.

पहिल्या टप्प्यात २,११५ कोटींचे वाटप सुरू

ऑगस्टपर्यंत झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी २,११५ कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना वाटप करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. त्याशिवाय, खरीप हंगामात झालेल्या प्रचंड नुकसानीसाठी अतिरिक्त निधी दिला जाणार आहे.

दरम्यान, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर तीव्र टीका केली आहे. त्यांनी सांगितले की, सप्टेंबरमधील पावसामुळे २४ जिल्ह्यांतील १३७ तालुक्यांमध्ये २६ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तरीदेखील केंद्राकडून मदतीचा प्रस्ताव तातडीने पाठवण्यात आलेला नाही आणि केंद्रीय पथके अद्याप पाहणीसाठी आलेली नाहीत, असा आरोप त्यांनी केला.



# कर्करोग उपचारासाठी राज्यात महाकेअर फाऊंडेशनची स्थापना

## राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय कर्करोगाशी संबंधित डे–केअर केंद्रांची संख्या वाढवणार

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील कर्करोगग्रस्तांना दर्जेदार उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी सर्वसमावेशक कर्करोग सेवा धोरण निश्चित करण्यात आले असून त्यासाठी महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन अर्थात महाकेअर फाऊंडेशन कंपनी स्थापन करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या कंपनीच्या माध्यमातून राज्यभरातील १८ रुग्णालयांतून कर्करोगाशी निगडीत विशेषोपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे राज्यात कर्करोगाशी संबंधित डे–केअर केंद्रांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. या धोरणानुसार कर्करोग रुग्णालयांची एल १, एल २, आणि एल ३ अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली आहे. या केंद्राच्या माध्यमातून रेडिओथेरपी, किमोथेरपी तसेच पदव्युत्तर आणि अतिविशेषोपचार शिक्षण, सर्व प्रकारच्या कर्करोगांचे निदान, शस्त्रक्रिया, भौतिकोपचार, मानसिक आधार आणि उपचार, संशोधन यांसह पॅलेटिव्ह उपचार, औषध सुविधा यांची उपलब्धता तसेच जनजागृतीचे उपक्रम राबविले जाणार आहेत.यात टाटा स्मारक रुग्णालय ही संस्था एल – १ स्तरावरील शिखर संस्था म्हणून निश्चित करण्यात आली आहे. तर छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, सर ज. जी. (जे. जे. ) वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय मुंबई, छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय कोल्हापूर, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे, येथील सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रूग्णालये तसेच नाशिक आणि अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाची दोन संदर्भ सेवा रुग्णालये अशी एकूण आठ केंद्र ही एल – २ केंद्र म्हणून निश्चित करण्यात आली आहेत.

## पंकजा मुंडेंचा दसरा मेळावा ठरणार वेगळा

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी चना डाळ, गुळ, गव्हाचे पीठ सोबत आणण्याचे समर्थकांना आवाहन

बीड / वृत्तसंस्था

राज्यातील आणि विशेषतः मराठवाड्यातील अतिवृष्टी व पुराने निर्माण केलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या यंदाच्या दसरा मेळाव्यांकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. पंकजा मुंडे यांच्या बीडमधील भगवान भक्ती गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याची तयारी सुरू आहे. मात्र, या वर्षीच्या पंकजा मुंडेंच्या दसरा मेळाव्याला राज्यातील पूरग्रस्तांसाठीची भावनिक किनार आहे. या पार्श्वभूमीवर यंदाचा मेळावा



'राजकीय व्यासपीठ' म्हणून नव्हे तर समाजकारणाशी जोडलेली परंपरा म्हणून साजरा होणार असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. तसेच मेळाव्याला येताना समर्थकांनी चना डाळ, गुळ आणि गव्हाचे पीठ घेऊन यावे, असे आवाहन एका व्हिडिओतून केले आहे.

श्वास असेपर्यंत ही परंपरा खंडीत होऊ देणार नाही

पंकजा मुंडे म्हणाल्या, राज्यातील काही भागात महापुराची परिस्थिती निर्माण झाली. प्रत्येकाचे पिक गेले. घरांमध्ये पाणी शिरले. काही लोकांचे तर जमीन आणि घरही वाहून गेले. त्यांच्यासाठी सरकार नक्कीच योग्य निर्णय घेईल, अशी मला पूर्ण शाश्वती आहे. आता येतोय दसरा मेळावा. हा दसरा मेळावा जरी आपण म्हणत असलो, तरी हा मेळावा नाही, कुठली सभा, सामाजिक किंवा राजकीय व्यासपीठ नाही. ही परंपरा आहे. जी परंपरा भगवान बाबांनी सुरू केली. ज्या परंपरेमध्ये अनेक लोक सहभागी झाले. त्यानंतर मुंडे साहेबांनी त्या परंपरेला उंचीवर नेले. त्यांच्या ही परंपरा तुमच्या आग्रहास्तव मी राखून ठेवली. माझ्या श्वासात श्वास असेपर्यंत ही परंपरा खंडित होऊ देणार नाही, असे म्हणत पंकजा मुंडेंनी यंदाच्या दसरा मेळावाही उत्साहात होणार असल्याचे स्पष्ट केले.

तुमच्या दर्शनाने मला ऊर्जा मिळते

त्या पुढे म्हणाल्या, मी भगवान बाबांच्या दर्शनासाठी येत आहे, सावरगाव येथील भक्ती गडावर भगवान बाबांच्या चरणी, त्यांची पूजा करण्यासाठी त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी येत आहे. आपण ही परंपरा खंडित होऊ देणार नाही.

### शिधा आणण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन

पंकजा मुंडे म्हणाल्या, कुणीतरी विचारले हा दसरा मेळावा साधेपणाने करणार का? मला हसू आले. माझा दसरा मेळावा साधाच असतो. अठरापगड जाती धर्माचा संगम असलेली ही परंपरा आहे. त्यामुळे, पूरग्रस्त भागात यंदा ज्यांच्या घरात चूल पेटू शकत नाही, दसऱ्यादिवशी पुरणपोळी खाता येणार नाही, त्यांच्यासाठी आपण पुढे या. आपण सर्वजण दसरा मेळाव्यासाठी येत असताना चना डाळ, गुळ, गव्हाचे पीठ आपल्यासोबत आणून भगवान बाबा चरणी अर्पण करा, असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.तसेच, भगवान बाबा चरणी आलेला हा प्रसाद त्या पूरग्रस्त गावात पोहच करायचा आहे. त्यासाठी, भेटूया सावरगाव घाट भगवान भक्ती गड येथे २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.



## पडळकर यांची सातत्याने जयंत पाटील यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका

सांगली /प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातील शाब्दिक युद्ध गेल्या काही दिवसांपासून चांगलेच पेटले आहे. पडळकर हे सातत्याने जयंत पाटील यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका करत आहेत. या कलगीतुऱ्यात आणखी भर पडली असून, आज पुन्हा पडळकरांनी जयंत पाटलांवर जहरी टीका केली आहे.

मला मंगळसूत्र चोर म्हणतात, तर जयंत पाटील यांनी सांगावे की मी त्यांच्या कितव्या बायकोचे मंगळसूत्र चोरले आहे, अशा शब्दात गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांच्यावर अत्यंत वादग्रस्त टीका केली आहे.




नांदेड : साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेल्या श्री रेणुकादेवी संस्थानने नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या पूरग्रस्तांना एक कोटी एक लक्ष रुपयाची सहाय्यता केली आहे. इतर धार्मिक संस्थान व सामाजिक संस्था यांनी सुद्धा अशाच प्रकारची सहाय्यता करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी मंगळवार दि. ३० सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेतून केले.जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी आज सकाळी यात्रा नियोजन अंतर्गत केलेल्या व्यवस्थेची पाहणी केली. त्यानंतर शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत लिफ्टसह स्कायवॉक, वाहनतळ आणि व्यापारी संकुल हे काम लवकरच पूर्ण केले जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. अतिवृष्टी बाधित नागरिक व शेतक-यांना आर्थिक मदत देण्यासाठी प्रशासन युद्ध स्तरावर काम

# शक्तिप्रदर्शन नव्हे, शेतकऱ्यांची सेवा हाच दसरा मेळावा

## मेळाव्याची परंपरा अबाधित ठेवणार, मदत देऊन पूरग्रस्तांचे अश्रूही पुसणार– एकनाथ शिंदे

मुंबई /वृत्तसंस्था

शिवसेनेचा परंपरागत दसरा मेळावा यावर्षी होणार असला तरी विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील पूर स्थिती लक्षात घेता त्या भागातील शिवसैनिकांनी मुंबईत न येता शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरसावावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

राज्यातील शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले असून त्यांचे अश्रू पुसणे ही सरकारची जबाबदारी आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि स्वतः शिंदे यांनी अतिवृष्टी ग्रस्त भागांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील दोन-तीन दिवसांत पंचनामे पूर्ण होऊन नुकसानीचे प्रमाण स्पष्ट होईल आणि त्यानंतर मदतीबाबत ठोस निर्णय घेतला जाईल, असेही ते म्हणाले.

शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचवली जाईल

मदतीसाठीचे नियम-अटी बाजूला ठेवून शेतकऱ्यांना तातडीने मदत करणे गरजेचे आहे, असे मंत्रिमंडळ बैठकीत एकमताने ठरल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. आधीच्या सरकारनेही मदत वाटपाच्या वेळी नियम शिथिल केल्याची आठवण त्यांनी करून दिली. पुरामुळे जमीन वाहून गेली



आहे, पशुधनाचे मोठे नुकसान झाले आहे, जीवितहानी झाली आहे तसेच काही ठिकाणी घरे अद्याप पाण्याखाली असल्याचे शिंदे यांनी सांगितले. अशा वेळी शिवसेना पूरग्रस्त शेतकऱ्यांना २६ प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचे किट देत असून, शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचवली जाईल, असे ते म्हणाले.

विरोधकांनी फोटोसेशन करून राजकारण करू नये

याप्रसंगी एकनाथ शिंदे यांनी विरोधकांनी फोटोसेशन करून राजकारण करू नये, असे आवाहन केले. पूर स्थितीतील साथीचे आजार पसरू नयेत यासाठी आरोग्यमंत्र्यांशी चर्चा झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कोल्हापूर, चिपळूण येथे ज्याप्रमाणे शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य केले होते त्याच प्रमाणे यंदा स्वच्छता मोहीम आणि आरोग्य शिबिरे घेऊन पूरग्रस्तांचे संसार पुन्हा उभे करण्यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

आपत्ती तिथे शिवसेना, संकट तिथे शिवसेना हेच आमचे धोरण आहे. आम्ही बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांनुसार ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करत आहोत, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

# संपादकीय

## अर्थव्यवस्थेची दमदार वाटचाल आणि स्वदेशीचा जागर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्था दमदार वाटचाल करत असून, जीएसटी दर कपातीसह 'स्वदेशीचा जागर' देशभर गाजतो आहे. ट्रम्प प्रशासनाच्या दबावाला ठामपणे उत्तर देत मोदी सरकारने कर कपात, स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारताचा ध्यास घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात वस्तू आणि सेवाकराच्या (जीएसटी) दरामध्ये मोठी कपात होणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार जीएसटी दरांमधील कपात २२ सप्टेंबरपासून लागू झाली आहे. याच दरम्यान, 'गर्व से कहो ये स्वदेशी है' हे अभियानही देशभर मोठ्या उत्साहात सुरू झाले आहे. अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील वाढलेल्या आयात शुल्क, एच-१ बी व्हिसा शुल्कातील वाढ अशा निर्णयातून मोदी सरकारवर दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर जीएसटी दर कपातीचा निर्णय अंमलात आला. दर कपातीच्या या निर्णयाला पूरक असा स्वदेशीचा जागरही सुरू झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था मृत झाल्याचे वक्तव्य करून आपली मानसिकता दाखवून दिली होती. भारतीय कृषी क्षेत्र अमेरिकेच्या शेतमालासाठी पूर्णपणे खुले करण्याची मागणी ट्रम्प प्रशासनाकडून करण्यात आली होती. ही मागणी शांतपणे फेटाळून लावत मोदी सरकारने ट्रम्प प्रशासनाच्या दबावतंत्राला कोणत्याही परिस्थितीत भीक घातली जाणार नाही, असे स्पष्ट केले. ट्रम्प प्रशासनाने भारताबद्दल अवमानजनक भाषा वापरूनही त्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याऐवजी मोदी सरकारने ठाम कृतीने उत्तर दिले. अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क दुप्पट केल्यामुळे भारताच्या निर्यातीवर मोठा परिणाम होणार, अशी भीती देशातील अनेक स्वयंघोषित अर्थतज्ज्ञांनी दाखविली होती. अमेरिकेचे दबावतंत्र एकीकडे कठोर होत असताना मोदी सरकारने वस्तू आणि सेवाकरात मोठा फेरबदल केला. वस्तू आणि सेवाकराचे पाच आणि १८ टक्के असे दोनच टप्पे राहतील, असे जाहीर करत मोदी सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील क्रांतिकारी ठरणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली. कार, दुचाक्या, ट्रॅक्टर, टिलरसारखी शेतीची अवजारे, खते यांसारख्या वस्तूंवरील जीएसटीवर मोठी कपात केल्यामुळे सर्वसामान्य भारतीय जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जीएसटीमध्ये मोठी कपात केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणखी एक आनंदाची बातमी दिली आहे. आज देश जीएसटी बचत उत्सव साजरा करत आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो की, आम्ही इथेच थांबणार नाही, असे म्हणत मोदी यांनी भविष्यात वस्तू व सेवा करात आणखी कपात होण्याचेही संकेत दिले आहेत.

जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी म्हणजे २२ सप्टेंबर रोजी चारचाकीच्या बाजारात विक्रीच्या नवनव्या विक्रमांची नोंद झाली. मारुती सुझुकीच्या ३० हजार गाड्या २२ सप्टेंबर रोजी विकल्या गेल्या. ह्युंदाईच्या ११ हजार, तर टाटा मोटर्सच्या १० हजार गाड्यांची विक्री एकाच दिवसात झाली. जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाली असतानाच दुसरीकडे भारतात बनवलेल्या आयफोन-१७ची विक्री १९ सप्टेंबर रोजी सुरू झाली. हा फोन खरेदी करण्यासाठी ग्राहकांच्या मोठ्या रांगा लागल्याचे दृश्य मुंबईसह अनेक शहरांमध्ये दिसले. ज्या अर्थव्यवस्थेची ट्रम्प प्रशासनाने हेटाळणी केली त्याच भारतात आयफोन-१७ सारख्या महागड्या फोनची खरेदी करण्यासाठी रांगा लागत आहेत. हे चित्र कार आणि महागड्या मोबाईलच्या विक्रीपुरते मर्यादित नाही. यातून भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या वाढत्या खरेदी शक्तीचे आणि दमदार अर्थव्यवस्थेचे दर्शन संपूर्ण जगाला घडले.

मोदी सरकारने आत्मनिर्भर भारत संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या निर्धाराने 'हर घर स्वदेशी, घर घर स्वदेशी' या अभियानाचा जागर सुरू केला आहे. भारतीय नागरिकांनी भारतात बनवलेल्या वस्तू खरेदी कराव्यात, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने करीत आहेत. भारतीय उत्पादकांनी, कारागिरांनी बनविलेल्या वस्तू खरेदी केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला मोठे बळ मिळेल.

### जाहीरनामा प्रगटन

**श्रीमती पी.व्ही. चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज, यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ३४१ / २०२४**
**जानकाबाई विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा बाबुराव पि. वैजनाथ घाडगे, रा.जवळबन ता. केज जि. बीड, हे दिनांक २४/०८/२०१२ रोजी, किंवा त्या सुमारास जवळवन ता. केज जि.बीड येथे मयत झालेल्या असून अर्जदार रा.जवळबन ता.केज जि. बीड, यांनी या कोर्टात सदरहू मयत बाबुराव पि. वैजनाथ गाडगे, रा. जवळबन ता. केज जि. बीड, यांचे

अर्जदार श्रीमती जानकाबाई भ्र. बाबुराव घाडगे - मयत

१. जयराम पि. बाबुराव घाडगे, वय- -६१वर्षे, धंदा-शेती रा. जवळवन ता. केज जि.बीड

२. महादेव पि. बाबुराव घाडगे, वय- ५५ वर्षे, धंदा - शेती रा. जवळवन ता. केज जि.बीड

३. मल्हारी पि. बाबुराव घाडगे, वय - ४९ वर्षे, धंदा - शेती रा. जवळबन ता. केज जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामासाठी वारसाचे सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज विधिज्ञ डी.बी.करपे यांच्यामार्फत केला आहे. त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदर सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क साबित दिसल्यास त्याला सदरहू मयत बाबुराव पि. वैजनाथ घाडगे, रा. जवळबन ता. केज जि. बीड, चे वारसाचे सर्टिफिकेट देईल. आज दि.२९/०९/२०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील दि. ०५/११/२०२५.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/-** | **आदेशावरून/-** |
| **क.लिपीक** | **स्वाक्षरित/-** |
| **२ रे सह दि.न्या.** | **सहा.अधीक्षक** |
| **व स्तर,केज** | **दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज** |

# मनपातील कंत्राटी कामगारांच्या बोनस प्रकरणात उच्च न्यायालयाने महापालिकेची याचिका फेटाळली!!

## कॉ.गणेश शिंगे यांच्या प्रदिर्घ न्यायालयीन लढ्याला आले यश

नांदेड :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत घनकचरा वेवस्थापनाच्या कामावरील कंत्राटी कामगारांना बोनस मिळावे म्हणून मनपातील कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष कॉ.गणेश शिंगे यांनी नांदेड मनपा प्रशासनाकडे मागणी केली होती. मनपा प्रशासनाने बोनस देण्यास नकार दिला होता. बोनसच्या मागणीसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियन तर्फे औद्योगिक न्यायालय जालना येथे तक्रार १२२/२०२४ दाखल केली होती. औद्योगिक न्यायालय यांनी कंत्राटी कामगारांना बोनस देण्यासाठी दिनांक ०२/०७/२०२५ रोजी अंत्रिम आदेश दिला होता.परंतु मनपा प्रशासनाने आदेशाची अंमलबजावणी करण्या ऐवजी औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालय खंडपीठ छ. संभाजीनगर येथे आव्हान याचिका क्र ११६७३/२०२५ दाखल केली होती. त्या याचिकेची सुनावणी झाली असून. उच्च न्यायाल्याने नांदेड महानगरपालिकाची मागणी फेटाळून लावून औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती देण्यास नकार दिला आहे.

वास्तविक पाहता कंत्राटी सफाई कामगार हे जरी कंपनीचे कामगार असतील तरी सुध्दा महापालिका ही मुळ मालक अर्थात झीळपलळश्रिश एाश्रिूशी आहे. महापालिकेने दि.१९.१२.२०१७ रोजी ठराव घेतल्यामुळे महापालिकेने कामगारांना यापूर्वी दि.०७.११.२०२२ रोजी दिवाळी २०२२ मध्ये बोनस दिला होता. महापालिकेने जे टेंडर निविदा काढली त्यात कामगार कायद्याचे पालन कंत्राटदाराला करावे लागेल अस स्पष्ट उल्लेख केलेला आहे. शासनाच्या प्रचलित नियमातील तरतुदीनुसार ज्या कंत्राटदाराने शासनाचे कंत्राट घेतले असेल त्यास कामगार कायदे आणि बोनस प्रदान कायद्याची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटदाराने जर एखाद्या कायद्याची अंमलबजावणी केली नाही अथवा वेतन थकविले तर महानगरपालिका सदर रक्कम कामागारांना देईल व कंत्राटदाराकडुन ती रक्कम वसूल करण्याची तरतुद आहे. महानगरपालिकेने बोनसची रक्कम कामागारांना देऊन कंत्राटदाराकडुन ती रक्कम वसूल करणे अपेक्षित असताना महापालिकेने तसे केले नाही.या प्रकरणात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियनने कंत्राटी कामगाराना बोनस मिळावे म्हणून न्यायालयात गेले आहेत आणि महापालिका मुळ मालक या नात्याने कामगारांना कंत्राटदाराने बोनस न दिल्यास त्यास बोनस अदाई करण्याठी आदेशीत करणे महापालिका प्रशासनाचे कर्तव्य असताना महापालिकेने तशी भुमिका न घेता औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी उच्च न्यायालयात अपिल दाखल केले होते परंतु महानगरपालिकेची याचिका फेटाळली असुन या प्रकरणात नांदेड महानगरपालिका प्रशासनाची नाच्चकी झाली आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर मात्र कामगार नेते कॉ. गणेश शिंगे यांच्या प्रदिर्घ न्यायालीन लढ्याला यश आले आहे. नांदेड मनपा कामगार कर्मचारी युनियनची बाजू ज्येष्ठविधीतज्ञ ॲड. पी. आर. कातनेश्वरकर व ॲड. उदय खोंडे तर नांदेड महापालिकेची बाजू ॲड. आर. के. इंगोले यांनी मांडली

# नांदेड उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ ठरले पूरग्रस्तांचे देवदुत संकट मोचक..!



नांदेड गेल्या महिना भरापासून सततचा सुरू असलेला निसर्गाच्या पाऊसा मुळे नांदेड शहरा सह जिल्ह्यात अहंकार झाला असून गोदावरी आसना नदी सह अनेक नदी नाल्यांना पूर आले असून रुद्र रूप धारण झाले असलेल्या नद्या नजदीक च्या अनेक गावाला या पाण्याचा येडा पडला होता या पाण्यामुळे अनेक गावचे नागरिक अडकून पडले होते या समयी उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांनी नागरिकांना आपत्ती व्यवस्था न विभाग यांना सुखरूप बाहेर काढून शासनातर्फे राहण्याची सोय करून देऊन संकट काळी धावून जाऊन तत्परतेने मदत करूण पुरगुस्त भागात अडकलेले अनेक महिला परुषांचे देवदूत ठरले ते सचिन खल्लाळ यांच्या या कामगिरीवर नांदेडकरांना एक चांगला तळमळीचा अधिकारी आसल्याचे जाणीव झाली .

नदीकाठचे अनेक गावे अक्षरशः पाण्याखाली गेले होते या भागातील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे शेतीत असलेले ऊस उडीद ज्वारी तूर मुग तीळ सोयाबीन कापूस अन्य पीके वाहून गेले नदीकडच्या गावातील वस्त्या अक्षरशः नदीच्या स्वरूपात आले व घरामध्ये असलेला अनेक संसार उपयोगी साहित्य नासधुस झाले आहे व शेकडो लोकांचा संसार उघडयावर आला यामधील काही नागरिक पाण्याच्या पूर परिस्थितीत अडकून पडलेले असतांना त्यांना शासनाच्या वतीने पुढाकार घेऊन नांदेड चे उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ आपले कर्तव्यव बजावत बजावत अर्धापूर तालुक्यातील अनेक गावे तर उत्तर मधील भालकी .बोंढारा . शगुन सिटी .नांदेड दक्षिण मधील राहेगाव . वसरणी .धनेगाव . रहिमपूर . या भागातील नागरिकांना स्वतः बोट मध्ये जाऊन सुखरूप बाहेर काढले उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांच्या मार्फेत शासनाकडून त्यांची राहण्याची व्यवस्था करून त्यांना पुन्हा जीवदान देणाऱ्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना नांदेडकरांनी कौतुक केले जात आहे हे यापूर्वी नांदेड जिल्ह्यात अनेक पदावर काम केले आहे ते काही वर्षापूर्वी खल्लाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालय उपविभागीय निवास अधिकारी म्हणून काम केले यांच्या कामाबद्दल जिल्हाधिकारी राहुल कर्डिले .आमदार आंनदराव तिडके बौढारकर . बालाजी कल्याणकर .



# पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी मुलांचा संघ रवाना

नांदेड पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धा दि.०१ ते ०५ ऑक्टोंबर या दरम्यान मध्यप्रदेशातील इंदोर येथील मेडिकॅप विद्यापीठात आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा मुलांचा संघ सोमवार, दि.२९ सप्टेंबर रोजी रात्री रवाना झाला आहे.

संघामध्ये आकाश ढोरे, रमेश गायकवाड, रियाज शेख, सौरभ राठोड, पियुषकुमार तिवारी, सचिन चव्हाण, सुनिल आडे, याकबरसालन पठाण, अंकुश बांडे, आफताब मान्सूरी, प्रदीप भगत, आदित्यकुमार प्रजापती, राजेश आडे, प्रिन्सकुमार तिवारी या खेळाडूसह संघाचे मार्गदर्शक तुळशीदास रोकडे, संघ व्यवस्थापक डॉ. ज्योतीराम चव्हाण यांचा सहभाग आहे.यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, क्रीडा विभागाचे संजयसिंह ठाकुर, राम किरकन, सुनील लुटे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# घुंगर्डे हादगाव ग्रामस्थांकडून पूरग्रस्तांसाठी जय्यत तयारी



शहागड /घुंगर्डे हादगाव

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथे पैठण नाथसागर धरणातुन पाणी सोडल्यामुळे गोदाकाच्या गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे त्यामुळे गोदाकाच्या जवळील गावांना राहण्याची व खाण्याची व्यवस्था घुंगर्डे हादगाव येथील ग्रामस्थांकडून सोय करण्यात आली. परीसरातील हसनापुर, गोंदी, कोठाळा, गावातील राहण्याची व खाण्याची व्यवस्था घुंगर्डे हादगाव मत्स्योदरी विद्यालयात व जिल्हा परिषद शाळेत व्यवस्था करण्यात आली आहे. गावात दवंडी देऊन गावकऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. या कामी गावातील सर्व तरुण वर्ग व ग्रामस्थ यांच्याकडून जेवणाची व राहण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. घुंगर्डे हादगाव ग्रामपंचायत कार्यालय कडुन व्यवस्था करण्यात येत आहे असे सरपंच वंदना काळे यांनी सांगितले आहे. गावातील नागरिकाकडून भाकरी भाजी गोळा करण्यात येत आहे.

**मा.श्री. आर. एस. ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, कस्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३१२/२०२५**
**( मार्फत विधिज्ञ श्री प्रतिमा एन जरांगे )**
**अर्जदार :- १. प्रल्हाद पि. बाबुराव घोडके, वय ७० वर्षे, धंदा-निरंक,**
**रा. जानकी नगर, पिंपरगव्हाण रोड, बीड, ता.जि. बीड.**
**विरुध्द निरंक**
**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी मयत नामे सरस्वती ग्र. प्रल्हाद घोडके या दिनांक १४/०६/२०२५ रोजी मोटार अपघातातत पुणे येथे मयत झालेले असुन अर्जदार हा मयताचा पती आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्याचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २४/०९/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:- १७/१०/२०२५.

**आदेशावरून/-**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**व.स्तर, बीड**

# आदर्श शिक्षकांना गावकऱ्यांचा अश्रूंनी भरलेला निरोप

## बारसवाडा जिल्हा परिषदेच्या शाळेत भावनिक क्षण

### आदर्श शिक्षक हे केवळ ज्ञानाचे दान करणारे नसतात तर ते गावाच्या सामाजिक व शैक्षणिक घडणीतील खरे शिल्पकार असतात



अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील बारसवाडा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आजचा दिवस गावकऱ्यांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी विस्मरणीय ठरला. शैक्षणिक कार्यात अपूर्व ठसा उमटवणारे आदर्श शिक्षक श्रीधर यशवंतराव कुलकर्णी सर व श्री लहू महादेव गोल्हार सर यांना गावकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी अश्रूंनी निरोप दिला. सजवलेल्या ट्रॅक्टरमधून मिरवणूक, विद्यार्थ्यांचे लेझीम पथक, माता पालकांनी केलेले औक्षण,गावकऱ्यांचा उत्साह आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील अश्रू या सगळ्यांनी बारसवाडा गाव भावनांनी ओथंबून गेले. श्रीधर कुलकर्णी सरांनी शाळेत तब्बल ८ वर्षे तर गोल्हार सरांनी १४ वर्षे अखंड सेवा बजावली. या काळात दोन्ही शिक्षकांनी केवळ शैक्षणिक जबाबदारीच पार पाडली नाही, तर गावकऱ्यांना 'शिक्षक कसा असावा' याचे प्रत्यक्ष उदाहरण घालून दिले.

गावकऱ्यांच्या मनात आणि मुलांच्या हृदयात या शिक्षकांचे स्थान कायमचे कोरले गेले आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, पालकांशी सातत्याने संवाद साधणे,शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी अथक परिश्रम घेणे आणि शाळेत नवनवीन उपक्रम राबवणे ही त्यांची कार्यपद्धती गावासाठी आदर्श ठरली.माजी सरपंच किसनतात्या गायकवाड म्हणाले आज आम्ही खऱ्या अर्थाने गावाच्या शैक्षणिक पायाला भक्कम आधार देणाऱ्या शिक्षकांचा निरोप घेत आहोत. त्यांच्या कामगिरीचे ऋण गावकऱ्यांच्या मनावर सदैव राहील. मुलांच्या मनात शिक्षणाची गोडी निर्माण करणे आणि उज्ज्वल भविष्याचा पाया घालणे हे त्यांचे खरे योगदान आहे.या निरोप समारंभासाठी गावकरी, पालक, बालक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राधाकिसन सावंत, केंद्रप्रमुख दत्ता भापकर,केंद्रप्रमुख योगेश झांबरे, दैनिक समर्थ राजयोग जिल्हा प्रतिनिधी फारुख शेख, तालुका प्रतिनिधी गजानन पांडुरंग पुरी, दखनी स्वराज्य जिल्हा प्रतिनिधी माऊली दोबोले, चालू वार्ता तालुका प्रतिनिधी ज्ञानेश्वर सोळुंके, माळकरी, शब्दभूमी तालुका प्रतिनिधी वायाळ,सरपंच रामेश्वर खंडागळे, उपसरपंच गजानन सावंत,तंटामुक्ती अध्यक्ष सुभाष मिठे,राजेंद्र सोनवणे,माजी सरपंच भगवान काफरे, उपाध्यक्ष आबासाहेब शिंदे, अशोक घाडगे,विष्णू पवार, मुख्याध्यापक कैलास जाधव,माजी मुख्याध्यापक सुभाषराव चाटे, यांच्यासह सर्व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लेझीम पथकाच्या तालावर निघालेल्या मिरवणुकीने गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. परंतु शेवटी निरोपाच्या क्षणी मुलांच्या आणि पालकांच्या,माता भगिनी यांच्या डोळ्यात अश्रू दाटले.

गावकऱ्यांच्या मते कुलकर्णी सर आणि गोल्हार सर यांच्या कार्याने केवळ शाळाच नाही तर संपूर्ण बारसवाडा गाव उजळून निघाले. आज ते निरोप घेत असले तरी त्यांच्या कार्याची आठवण आणि प्रेरणा प्रत्येक गावकऱ्याच्या हृदयात कायम राहील.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्जुन खोंडे,गोकुळ बोबलट,सुरेखा जाधव,वणवे सर,वणवे मॅडम, आकाश गडवे यांनी परीश्रम घेतले.सुत्रसंचलन संतोष सावंत यांनी केले.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.२४.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **इरफान रहेमान शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | इरफान रहेमान शेख | स्वतः | ११.१०.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६२२ दि.२४.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **इमरान रहेमान शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | इम्रान रहेमान शेख | स्वतः | २५.०६.१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# अंबडमधून हरवलेली इकरा अजूनही बेपत्ता- माहिती देणाऱ्यास १ लाखांचे बक्षीस जाहीर

जालना /प्रतिनिधी

दि.३० सप्टेंबर अंबड तालुक्यातील फैसलाबाद कॉलनीतून कु.इकरा अमजद शेख वय ३ वर्ष १ महिना ही बालिका दि.१२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता अज्ञात व्यक्तीने आमिष दाखवून पळवून नेली होती.या घटनेनंतर तब्बल नऊ महिने उलटले तरी इकराचा काहीच मागमूस लागत नाही. या गंभीर घटनेला वाचा फोडण्यासाठी आणि बालिकेचा शोध लागावा यासाठी महाराष्ट्र पोलिस दलाने १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.ही माहिती गुन्हे अन्वेषण विभागाच्या सीआयडी पोलिस निरीक्षक सौ.अंजली राजपुत यांनी



दिली.इकराच्या वडिलांनी, अमजद हाजी शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबड पोलिस ठाण्यात गु.र.नं. २२/२०२५ कलम १३७(२) भा.दं.सं. प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून या गुन्ह्याचा तपास राज्य सीआयडी जालना यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.इकराचे शारीरिक वर्णन उंची अंदाजे २.५ फुट बांधा सडपातळ रंग सावळा केस काळे कुरळे चेहरा गोल कपडे गुलाबी रंगाचा फ्रॉक भाषिक ओळख तिला हिंदीतील काही शब्द बोलता येतात. सीआयडी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की या वर्णनाची बालिका दिसून आल्यास किंवा तिला पळवून नेणाऱ्या संशयिताविषयी कोणतीही माहिती असल्यास पोलिस निरीक्षक अंजली राजपुत मो. ८६२५८५३७८६ यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असून पोलिस दलाकडून त्याला १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# नवरात्रीनिमित्त जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूर येथे भेट देऊन घेतले दर्शन

## माहूर येथे विविध विकासकामांचा घेतला आढावा

माहूर रेणूका देवी संस्थान तर्फे पूरग्रस्तानसाठी मुख्यमंत्री सहायत्ता निधीस १ कोटी रुपयांचा धनादेश

नांदेड :- नवरात्रीनिमित्त जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी आज माहूर येथे भेट देऊन श्री. रेणूका मातेचे दर्शन घेऊन माहूर येथील विविध विकास कामांचा आढावा घेतला.

या वेळी जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी कैलास टेकडीकडे जाणारा रस्ता, माहूर विकास आराखडा तसेच जलसंधारणाची कामे यांचा सविस्तर आढावा घेतला. तसेच भाविकांच्या सोयीसाठी स्काय वॉकचे काम दिवाळीपूर्वी सुरू होणार असून यामुळे दररोज ५००० हून अधिक भाविकांचा पायी येणाऱ्या नागरिकांचा फुटफॉल वाढण्याची शक्यता आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

यासोबतच भाविक व पर्यटकांच्या सोयीसाठी व्यापारी संकुल, पार्किंग सुविधा व निवास व्यवस्था यांच्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पत्रकारांशी संवाद साधत स्थानिक नागरिकांच्या मागण्या व सूचना जाणून घेतल्या.


तसेच श्री रेणुका देवी संस्थान माहूरगड यांनी मुख्यमंत्री सहायता निधी यास एक कोटी रुपयांचा निधी पूरग्रस्तांसाठी दिला असल्याबद्दल जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी संस्थानाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक, उपाध्यक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.मळगणे, सचिव श्री जेनीतचंद्र दंतोला उपविभागीय अधिकारी किनवट व सर्व विश्वस्त यांचे विशेष करून आभार मानले. यासोबतच सर्व नागरिक व संस्थांना आपापल्या परीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कर्डीले यांनी केले.पूरग्रस्त नागरिक आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी सरकारकडून जे अनुदान जाहीर झाले आहे ते दिवाळीपूर्वी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.या प्रसंगी कार्यकारी अभियंता श्री. चोपडे, तहसीलदार अभिजीत जगताप, मुख्याधिकारी विवेक कांदे, उपअभियंता श्री. भिसे तसेच पोलीस निरीक्षक श्री. कराड यांच्यासह तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

# लोणार भायगाव येथे धनगर आरक्षणासाठी गोविंद जाधव यांनी पेटवली कार सरकारला थेट इशारा–उद्रेकाच्या लाटेत राज्य हादरले

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील लोणार भायगाव येथे समाजाच्या न्याय व हक्कासाठी संतप्त झालेल्या गोविंद जाधव यांनी चार चाकी गाडी पेटवली धनगर समाजाच्या न्यायाच्या मागणीसाठी राज्यभर निर्माण होणाऱ्या आंदोलनाच्या आधीच लोणार भायगावचे सरपंच आणि धनगर आरक्षण आंदोलनाचे आक्रमक कार्यकर्ते गोविंद जाधव यांनी आज थेट आपली स्विफ्ट कार पेटवून सरकारवर तीव्र रोष व्यक्त केला. हा निषेध इतका जोरदार होता की महामार्गावर वाहतूक ठप्प झाली आणि परिसरात तणावाचे वातावरण पसरले. सरकारच्या ढोंगावर लोकांचा संताप धनगर आरक्षणासाठी उपोषणकर्ते दीपक बोराडे यांच्या शिष्टमंडळाला भेट देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाधिवक्त्यांच्या सल्ल्यानुसार आरक्षणाची प्रक्रिया पार पाडता येईल असे सूचक विधान केले. पण आज महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी स्पष्ट केले की धनगर

**धनगर आरक्षणाचे घोंगडे कायदेशीर कचाट्यात भिजू नका समाजाला न्याय द्या नाहीतर ही आग रस्त्यावर आणि सरकारवर पडेल**



आरक्षणाविरोधात सर्व रिपोर्ट आहेत आणि फक्त न्यायालयातूनच आरक्षण मिळू शकते या प्रतिवादाने समाजात प्रचंड संताप निर्माण झाला.

२०१४ पासूनच्या आश्वासनांचा फसवणूकचा पर्दाफाश

मुख्यमंत्र्यांनी २०१४ पासून दोन वेळा लेखी आणि तीन वेळा तोंडी आश्वासने दिली पहिल्या कॅबिनेटमध्ये आरक्षण लागू होईल असे सांगितले पण आतापर्यंत ११२ कॅबिनेट बैठका पार पडल्या तरी धनगर आरक्षणासाठी एकही जीआर काढण्यात आलेले नाही. यामुळे तरुण समाजात सरकारविरोधी उद्रेकाची लाट उठली आहे.

गोविंद जाधव यांच्या कार पेटवण्याच्या घटनेने उद्याच्या राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनाची पूर्वसंध्या अधिक तगडी केली आहे. आंदोलनकर्ते हे स्पष्ट करतात की सरकारने जर न्याय दिला नाही

# माजी मंत्री खा अशोकराव चव्हाण यांच्या पाठपुराव्याला यश

## नांदेडला उभारणार २०९ कोटींचे १५० खाटांचे कर्करोग रुग्णालय, मंत्री मंडळांचा निर्णय

नांदेड : नांदेडला कर्करोगाशी निगडीत विशेष उपचार सुविधांचे रुग्णालय उभारण्याचा निर्णय भाजप महायुती राज्य सरकारने घेतला असून, त्यासाठी माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.



राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत कर्करोगासाठी महाराष्ट्रात त्रिस्तरीय समग्र उपचार सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, खा. अशोकराव चव्हाण यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे त्यामध्ये नांदेडचाही समावेश करण्यात आला आहे. या निर्णयानुसार नांदेडसह राज्यातील ९ शहरांमध्ये 'एल-२' वर्गाची उपचार सुविधा असलेली रुग्णालये उभारली जाणार आहेत. नांदेड मध्ये प्रस्तावित कर्करोग रुग्णालयाचा अंदाजित खर्च २०९ कोटी रुपये असून, या रुग्णालयात १०० खाटांचा आंतर रुग्ण विभाग तर ५० खाटांचा दैनंदिन उपचार विभाग असणार आहे. या ठिकाणी सर्जिकल ऑन्कोलॉजी (कॅन्सर शस्त्रक्रिया), कीमोथेरपी व रेडिएशन थेरपी उपचार उपलब्ध असेल. या शिवाय या रुग्णालयात स्पेशलिस्ट डॉक्टर्स (ऑन्कोलॉजिस्ट्स) सुद्धा नियुक्त केले जाणार आहेत. या रुग्णालयाच्या उभारणीनंतर गंभीर परिस्थितीतील रुग्ण वगळता इतर बहुतांश कर्करोगग्रस्त रुग्णांचा नांदेडमध्ये योग्य उपचार करणे शक्य होणार आहे.

खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेड शहर व जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक उन्नत करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे विविध मागण्या केल्या आहेत. त्यासाठी त्यांच्याकडून दोन्ही स्तरावर पाठपुरावा देखील सुरु आहे. नांदेडला उभारण्यात येणारी कर्करोग विशेषोपचार सुविधा देखील त्याच पाठपुराव्याचे फलित आहे. या निर्णयाबद्दल खा. अशोकराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत.

# भाजप प्रवक्ते पिंटू महादेव यांना अटक करा – कॉँग्रेस शिष्टमंडळाचे निवेदन

नांदेड लोकसभा विरोधी पक्षनेते खा. राहूल गांधी यांना गोळ्या घालून मारण्याचे व्यक्तव्य केरळ येथील भाजपचे प्रवक्ते पिंटू महादेव यांनी केले आहे. लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्यांबदल येवढे मोठे व्यक्तव्य करणे निषेधार्थ आहे. त्यांना तात्काळ अटक करून कार्यवाही करावी अशी मागणी खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या उपस्थितीत शहर व जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली.

केरळ येथील भाजपचे प्रवक्ते पिंटू महादेव यांनी लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्यांबदल येवढे मोठे व्यक्तव्य करणे निषेधार्थ आहे. त्यामुळे त्यांना तातडीने अटक करावे अन्यथा कॉँग्रेस आंदोलनात्मक पावित्रा घेईल असे खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी सांगितले. निवेदन देतेवेळी खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेंद्र घोडसकर, मसुद खान, शेर अली, अब्दुल गफार, रहिम खान, महेश देशमुख तरोडेकर, अजिज कुरेशी, मुन्ना अब्बास, निरंजन पावडे, श्रीनिवास मोरे, सतिश देशमुख तरोडेकर, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, डॉ.करुणा जमदाडे, बापूसाहेब पाटील, माधव पवळे, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, दिपकसिंग हजुरिया, अंबादास रातोळे, गगन यादव, महेश मगर, संजय वाघमारे, इंजि.नसिम पठाण, ज्योती कदम, अनिल कांबळे, प्रसेनजित वाघमारे, सुरेखा वैद्य, नागराज सुलगेकर, गोविंद पाटील, सिमाँन नागोरे, धनंजय उमरेकर, गौतम सिरसाट, ऋषी देशमुख, प्रकाश दिपके आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड पोलीस दलातील सूर्यभान कागणेसह एक फौजदार आणि एक हवालदार सेवानिवृत्त

नांदेड : नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील जनसंपर्क विभागात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक (ग्रेड) सूर्यभान कागणेसह तिघेजण नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. या तिघांनाही पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर अश्विनी जगताप यांनी निरोप दिला. यावेळी सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. हा कार्यक्रम मंथन सभागृहात मंगळवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी घेण्यात आला.

यापुढील आयुष्य सेवानिवृतांनी आपल्यासाठी व आपल्या कुटूंबासाठी अधिक वेळ देऊन आरोग्यांची काळजी घेत सुखी आणि आनंदी राहण्याचा सल्ला अबिनाश कुमार यांनी दिला. यावेळी पोलीस कल्याण विभागाचे



निरीक्षक जगदीश मंडलवार, जनसंपर्क विभागाचे पोलीस उपनिरीक्षक जळबाजी गायकवाड, पत्रकार विजय जोशी, प्रल्हाद कांबळे, राजू झंवर यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदार मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रूक्मीण कानगुले यांनी केले. तर जनसंपर्क विभागातील अंमलदार मारोती कांबळे, रविंद्र राठोड, विनोद भंडारे, पोलीस कल्याण विभागातील अंमलदार सविता भिमलवाड यांनी परिश्रम घेतले. सेवानिवृत्त झालेल्या मध्ये पोलीस उपनिरीक्षक सूर्यभान कागणे, केशव चाटे आणि चालक हवालदार दत्ता गीते यांचा समावेश होता. दरमहा तपासणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात आलेले पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनीही सूर्यभान कागणे यांना शुभेच्छा दिल्या.

# पूरग्रस्तांच्या वेदनेत दिलासा श्री सिद्धीविनायक महिला पतसंस्थेचा मायेचा हात

तिर्थपुरी /गजानन मुळे

गोदावरीच्या पुरामुळे घरदार सोडून मत्स्योदरी महाविद्यालयात आश्रयाला आलेल्या निराधार कुटुंबांच्या चेहऱ्यावर आज समाधानाची एक हलकी स्मितरेषा उमटली कारण त्यांच्या ओठांवर फराळाचा घास पोचवणारा हात कोणाचा तर श्री सिद्धीविनायक महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित तिर्थपुरी शाखा यांचा होता.संकटाच्या काळात एक वेळ भाकरी मिळणे हेच मोठे भाग्य ठरते.अशा वेळी संस्थेच्या वतीने पूरग्रस्तांच्या हातात फराळाचे ताट ठेवले गेले आणि थकलेल्या हादरलेल्या मनांना दिलासा मिळाला. दि.३० सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या या उपक्रमात चेअरमन श्री.बळीराम गोरे, शाखाधिकारी श्री. साळीकराम शिंदे,कर्मचारी श्री. गणेश कातकडे,श्री.विष्णु गव्हाणे,सौ.अनिता शिंदे,श्री. अशोक डोंगरे यांनी स्वतः पुढाकार घेऊन पूरग्रस्तांना हातभार लावला.या वेळी महाविद्यालयाचे श्री.लाखे सर, श्री.बैनाडे सर,श्री.जाधव सर, श्री. कांबळे सर,श्री.घोगरे सर आणि श्री.गायकवाड मामा हेही उपस्थित होते.त्यांच्या सहकार्यामुळे हा



उपक्रम अधिक प्रभावी ठरला.फराळाचा घास घेताना काहींच्या डोळ्यांत कृतज्ञतेच्या अश्रूंनी दाटून आले. आपत्तीमध्ये जेव्हा स्वतःचेच साथ सोडतात, तेव्हा समाजातील असे हात आधाराला येतात हे विसरणे शक्य नाही अशा भावना पूरग्रस्तांनी व्यक्त केल्या.नैसर्गिक संकटात फक्त शासनच नव्हे तर समाजातील संस्था व संघटनाही खंबीरपणे उभ्या राहतात याचे जिवंत उदाहरण म्हणजे श्री सिद्धीविनायक महिला पतसंस्था ही मदत फक्त फराळ नाही, तर मायेची उब जिव्हाळ्याची साथ आणि जगण्याची नवी उमेद आहे.

# महाकाली दुर्गा मित्र मंडळाच्या च्या रक्तदान शिबीरात पन्नासहून अधिक रक्तदात्यांनी केले रक्तदान

नांदेड नवरात्र महोत्सवा निमित्ताने धनेगाव येथील तिरुपती नगर येथे महाकाली दुर्गा मित्र मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला युवकांसह,नागरिक व महिलांचा सहभाग होता.एकूण ५० रक्तदान बॉटल्या संकलन करण्यात आल्या यात नंदिग्राम ब्लड बँकेचा सहभाग होता. या रक्तदान शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, सरपंच प्रतिनिधी बालाजी खोसडे, जिल्हाध्यक्ष भानुदास कोल्हे, उपशहर प्रमुख पप्पू गायकवाड,उत्तम शिंदे, राजेश गायकवाड आयोजक महाकाली



दुर्गा महोत्सवाचे अध्यक्ष बालाजी भगारे, व त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने घेण्यात आला होता.गोपीनाथ मुंगल,जगदीश निलेवाड, दर्शन सूर्यतळे,राजू धनकवार, संघरत्न पवळे, अजीम पठाण, अवधूत दासरवाड, किरण मोरे, कुंदन लांडगे, भजेश कोकणे,कृष्णा वाघमारे शिबिरास युवक नागरिक व महिलांची पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिल्हाधिकारी अमिशा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक नागरिकांना तक्रारी मांडण्याचे आवाहन

जालना /प्रतिनिधी

द. ३० मगळवार रोजी ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व अडचणींचे निवारण करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.येत्या ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक पार पडणार आहे.या बैठकीस समितीवर नियुक्त सर्व शासकीय व अशासकीय सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन



करण्यात आले आहे.

नागरिकांसाठी सुवर्णसंधी :

जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या ग्राहक हिताशी संबंधित तक्रारी या बैठकीत थेट मांडता येणार आहेत. इच्छुकांनी आपल्या तक्रारींचा लेखी अर्ज घेऊन प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित राहावे असे प्रशासनाचे स्पष्ट आवाहन आहे.ऑनलाईन तक्रार निवारण सुविधा ग्राहकांच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासनाने जालना जिल्ह्याचे अधिकृत संकेतस्थळ क्षरश्रपर.पळल.ळप वर स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून दिले आहे. या माध्यमातूनही नागरिक आपल्या समस्या आणि तक्रारी नोंदवू शकतात.ही माहिती जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य सचिव तथा जिल्हा पुरवठा अधिकारी सौ.सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली.

ग्राहकांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासन गंभीर असून नागरिकांनी या संधीचा उपयोग करून आपल्या तक्रारी मांडाव्यात असे आवाहन करण्यात आले आहे.




बदनापूर /प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य पथक, रोशनगाव येथील मुख्य औषध निर्माण अधिकारी मा.रविंद्र रामलिंग गोजेगावे यांच्या सेवानिवृत्ती समारंभाचा भव्य सोहळा मंगळवार दि.३० सप्टेंबर २०२५ रोजी आयुर्वेदिक दवाखाना रोशनगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडला.सन १९९८ पासून अखंड २८ वर्षे गावकऱ्यांच्या आरोग्य सेवेसाठी अहोरात्र झटणाऱ्या गोजेगावे सरांना या प्रसंगी मानाचा मुजरा करण्यात आला.त्यांच्या सेवाभावी वृत्ती प्रामाणिकपणा आणि लोकाभिमुख कार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी केला.या कार्यक्रमास तालुका कार्याधिकारी रोशनगाव ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच,तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांनीच गोजेगावे सरांच्या कार्याची आठवण करून दिली आणि त्यांचे योगदान अविस्मरणीय असल्याचे नमूद केले.स्नेह सन्मान आणि कृतज्ञतेच्या वातावरणात झालेल्या या समारंभात निरोप देताना उपस्थितांनी त्यांना आरोग्यदायी व आनंदी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# संघाच्या दसरा कार्यक्रमाला कमलताई गवई उपस्थित राहणार !

## राजेंद्र गवईंचा पाठिंबा, वैयक्तिक संबंध आणि विचारधारा वेगवेगळी असल्याचा दावा

अमरावती /प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं यंदा शताब्दी वर्ष असून त्यासंबंधित ५ ऑक्टोबर रोजी अमरावतीतील दसरा महोत्सव कार्यक्रम होणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. कमलताई गवई ज्या रा सु गवई यांच्या पत्नी तर भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री आहेत. त्या उपस्थित राहणार आहेत. कमलताईंनी निमंत्रण स्वीकारलं असल्याची माहिती आहे. यामुळे वाद निर्माण झाला असून, अनेकांनी यावर आक्षेप घेतला आहे.

अमरावतीत ५ ऑक्टोबरला संघाचा विजयदशमी सोहळा श्रीमती नरसम्मा महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. संघाच्या वतीने प्रमुख वक्ता म्हणून प्रज्ञा प्रवाहाचे संयोजक आणि संघाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीचे सदस्य जे. नंदकुमार उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. याच कार्यक्रमाचे निमंत्रण कमलताईंना देण्यात आलं आहे.

कमलताई गवई या संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाहीत अशा आशयाचं एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत होतं. आपण आंबेडकरी विचारांच्या असून तो विचार सोडणार नाही असं त्या पत्रात नमूद करण्यात आलं होतं. पण हे पत्र बनावट असल्याचा दावा केला जात आहे. अशात आता कमलताई गवई संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याचं त्यांचे पुत्र राजेंद्र गवई यांनी अप्रत्यक्षपणे सांगितलं आहे.

या संबंधी बोलताना राजेंद्र गवई म्हणाले की, रा सू गवई यांचे भाजप नेत्यांशी जवळचे संबंध होते. देवेंद्र फडणवीसांसोबतही त्यांचे चांगले संबंध होते. त्यांची विचारधारा वेगळी असली तरी राजकारणापलिकडे त्यांनी मैत्री जपली होती. त्यामुळे एखाद्या वेगळ्या विचारसरणीच्या कार्यक्रमाला गेले तर आपली विचारधारा बदलेल असं काही नाही. अशा कार्यक्रमाला जावं.

आम्ही कधीही सत्तेच्या मागे गेलो नाही. दादासाहेबांना या आधी मुख्यमंत्रिपदाचीही ऑफर होती, पण त्यांनी विचारधारा बदलली नाही. मलाही अनेकदा ऑफर देण्यात आल्या, तरीही आपण विचारधारा बदलली नाही. भूषण गवई आता मोठ्या पदावर गेले आहेत. त्यामुळे या गोष्टीवरून काही चर्चा होते. मी



आईसाहेबांच्या पाठीशी आहे. त्यांनी कोणताही निर्णय घ्यावा, मी खंबीरपणे मागे असेन असं राजेंद्र गवई म्हणाले. कमलाताईंच्या संभाव्य उपस्थितीवरून वाद निर्माण झाला असला, तरी इतिहास वेगळंच सांगतो. १९८१ साली झालेल्या संघ शिक्षा वर्गाच्या समारोपाला रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि कमलाताईंचे पती रा. सू. गवई हजर होते. तेव्हाच्या दैनिकांमध्ये हे छायाचित्रही छापून आलं होतं. शिवाय संघाच्या व्यासपीठावर आतापर्यंत अनेकदा अन्य विचारसरणीतील प्रमुख पाहुणे येऊन गेले आहेत. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी हे याचं सगळ्यात मोठं उदाहरण.

या कार्यक्रमाला कमलताईंनी जावं अथवा नाही यावरून बरेच मतप्रवाह दिसून येत आहेत. मात्र स्व. रा. सू. गवई असोत किंवा त्यांच्या पश्चात श्रीमती कमलताई गवई असोत, गवई परिवाराने नेहमीच समाजिक सौहार्द जपलेलं असल्याच नेहमीच दिसून येतंय. सार्वजनिक जीवनात काम करताना सर्वधर्म समभाव हा एकच उद्देश त्यामागे असल्याचं त्यांचं मत आहे. दरम्यान, कमलताई गवई या संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाहीत अशा आशयाचं एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत होतं. आपण आंबेडकरी विचारांच्या असून तो विचार सोडणार नाही असं त्या पत्रात नमूद करण्यात आलं होतं. पण हे पत्र बनावट असल्याचा दावा केला जात आहे. अशात आता कमलताई गवई संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याचं त्यांचे पुत्र राजेंद्र गवई यांनी अप्रत्यक्षपणे सांगितलं आहे.

## बळीरामपुरीतील श्री संत रोहिदास महाराज मंदिरास तीर्थक्षेत्राचा ब दर्जा..

नांदेड महाराष्ट्र शासनाने नांदेड तालुक्यातील बळीरामपूर येथील श्री संत रोहिदास महाराज मंदिर ब दर्जा देण्याचे निर्णय दि २८ रोजी सोमवारी. पुण्यश्लोक आदल्यादेवी होळकर अंतर्गत बैठकीत दर्जा देण्याचा निर्णय शासनाने जाहीर केले आहे निर्णय स्वागत बळीरामपूर सरपंच इंद्रजीत पांचाळ यांनी केले आहे

पुण्यश्लोक आदिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा अंतर्गत बळीरामपूर येथील श्री संत रोहिदास महाराज मंदिरास ब दर्जास मिळाल्याने भक्तामध्ये उत्साहाचे वातावरण आहे या दर्जामुळे या मंदिरांचा विकास अधिकचा होईल असा विश्वास बळीरामपूरचे सरपंच प्र इंद्रजीत पांचाळ यांनी केला आहे अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष वामनराव विष्णूपुरीकर यांनी दिली

## शेतकऱ्यांनी दिला आमदारांची गाडी फोडण्याचा इशारा...!

नांदेड :नांदेड पाऊसा मुळे नांदेड जिल्ह्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे बारड येथील शेतकऱ्यांनी नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार यांची गाडी दि ३०रोजी मंळवारी रस्ता रोको आंदोलन दरम्यान आडवून दुष्काळ जाहीर करा अन्यथा तुम्हाला फिरू देणार जाणार नाही दुष्काळ जाहीर नाही झाला गाडी फोडण्याचा इशारा बारड येथील शेतकरी बांधवांनी दिल्या चे दिसून येते .

नांदेड जिल्ह्यात शेतकऱ्यांना एकरी १लाख रुपयांचे मदत द्या नांदेड जिल्ह्या वोल्ला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा सरकारमधील आमदारांना जिल्ह्यामध्ये फिरू देणार नाही असा आक्रमक इशारा शेतकऱ्यांनी आमदार राजेश पवार यांना दिला दिवाळीच्या पुर्वी वोल्ला दुष्काळ जाहीर न झाल्यास शेतकरी सरकार मधील आमदार खासदार मंत्री सरकार यांना जिल्ह्यात फिरु देणार नाही अशी भूमिका बारड येथील शेतकऱ्यांनी घेतली आहे

## राहेगाव येथील पूरग्रस्तांना आ. बोंढारकर यांच्यावतीने धान्य किटचे वाटप

नवीन नांदेड /प्रतिनिधी

शिवसेनेच्या विचारानुसार ८० टक्के समाजकारण २०% राजकारण या म्हणी वरती रिलीज होऊन शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथरावजी शिंदे साहेब व शिवसेना उपनेते तथा मंत्री विधानपरिषद गटनेते ना.हेमंतभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार



आनंदराव पाटील बोंढारकर यांच्यासमवेत नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील राहेगाव येथील शेकडो पूरग्रस्तांना मदत म्हणून आमदार बोंढारकर यांनी धान्य किटचे वाटप करण्यात आले.

त्यावेळी उपस्थित आमदार आनंदराव पाटील बोंढारकर,तहसीलदार संजय वारकड,जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, गटविकास अधिकारी आडेराघो,छऊढ्ऋटिमचे झख राठोड सर,शहरप्रमुख तुलजेश यादव,तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे,श्याम पाटील वानखेडे,बालाजी पाटील भायेगावकर,किशन भोग,अर्जुन भोग,नारायण देशमुख यांच्यासह आदी गावकरी उपस्थित होते..

# धानोरा रोडच्या होणाऱ्या कामाचे श्रेय फक्त जनतेलाच- बीड शहर बचाव मंच

## कोणत्याही प्रस्थापित श्रेय लाट्या दिवट्यांनी श्रेय लाटू नये बीड शहर बचाव मंचाने ठणकावले
## न.प. बीड ने सर्वात आधी बीड शहर बचाव मंचाला सुरुवात होणाऱ्या कामाची माहिती कळवली

प्रतिनिधी । बीड

धानोरा रोडच्या सुरू होणाऱ्या कामाचे श्रेय फक्त सातत्याने आंदोलने करणाऱ्या स्थानिक जनतेच्या प्रयत्नांनाच आहे. कोणत्याही प्रस्थापित घराणेबाज श्रेय लाट्या दिवट्यांनी याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये असे बीड शहर बचाव मंच सर्व प्रस्थापित दिवट्यांना ठणकावत आहे. धानोरा रोडची स्थानिक जनता तसेच या रोडवर असणाऱ्या नऊ शाळेंमधील विद्यार्थी व त्यांचे पालक, या शाळेंमध्ये कार्यरत असलेले सर्व कर्मचारी अध्यापक व शिक्षक वर्ग, विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी सर्व वाहनधारक, वाहन चालक मंडळी, धानोरा रोडशी जोडलेली सर्व छोटी गावखेडी, या गावांमधून बीड शहराला दूध आणि भाजीपाला पुरवठा करणारे सर्व शेतकरी अशी सर्वच जनता गेल्या वीस वर्षापासून भीषण हाल अपेष्टा या धानोरा रोडच्या दुर्दशेमुळे सहन करत आलेली आहे तसेच या रोडच्या विकासाच्या कामासाठी आंदोलने करत आलेली आहे. स्थानिक जनता गेल्या २० वर्षापासून सतत या रोडच्या विकास कामांसाठी संघर्ष करत आहे. या सर्व स्थानिक जनतेने वेळोवेळी या रस्त्याच्या विकासासाठी मोठी आंदोलने केली आहेत. स्थानिक जनतेने अनेक वेळा या रोडच्या विकासासाठी निवेदने दिली आहेत. या सर्व गतकाळामध्ये ही सर्व प्रस्थापित घराने बाज 'श्रेय लाटू दिवटे कमिटी' आणि श्रेय लाटू लोकप्रतिनिधी दिवटे मंडळी कुठे होती..??

ही सर्व दिवटे मंडळी विकासाचे दिवे नेमके कुठ लावत बसलेली होती ? ज्या प्रकारे धानोरा रोडची दुर्दशा झाली आहे तशीच दुर्दशा



सर्व शहराची आज झालेली आहे. या प्रस्थापित दिवट्यांनी काही कामे गुत्तेदार म्हणून जरी केलेली असतील तरी त्याचेही तीन तेरा नऊ बारा वाजलेले आहेत. बीड शहरात अतिशय निकृष्ट दर्जाची बोगस कामे या लोकांनी केलेली आहेत. यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये आपण बीड शहराचे चाललेले हाल पाहत आहोत. धांडे नगर, स्वराज्य नगर भागामध्ये नागरिक काय मरणांतक हाल अपेष्टा सहन करीत आहेत हे आपण सर्वजण रोज पहात आहोत. शहराच्या या झालेल्या दुर्दशेचे श्रेय याच सर्व प्रस्थापित दिवटे कमिटीला जाते. जसे एखाद्या रस्त्याचा निधी मंजूर झाल्यानंतर श्रेय लाटण्यासाठी हे सर्वजण पुढे येतात तसेच शहरातील झालेल्या दुर्दशेची जबाबदारी घेण्यासाठी या सर्वांनी पुढे येऊन त्याचेही श्रेय घेतलेच पाहिजे. धानोरा रोड साठी यापूर्वीही मंजूर झालेले निधी कुठे कुठे वापरण्यात आले आहेत..? त्याचे काय केले हेही जनतेला समोर येऊन सांगावे. धानोरा रोडचा विकास जाणीवपूर्वक का प्रलंबित ठेवला याचीही कारणे जनतेपुढे येऊन द्यावीत. प्रस्थापित घराण्यांच्या प्रॉपर्टीज-इस्टेटस् ज्या ठिकाणी आहेत तिथे सिमेंट रोड,नाल्या रस्ते,दिवे, सर्व सुविधा आधी निर्माण केल्या जातात. मग दरवर्षी नगरपालिकेचा कर भरणाऱ्या जनतेला या सुविधा का मिळत नाहीत..?? तुमच्या तीन-तीन पिढ्या सत्ता भोगून राज्य करून जातात तरी जनतेच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न 'सुटतच' नाहीत हा कसला विकास आहे, ही विकासाची कुठली पद्धत आहे...

?? अटल अमृत जल योजना व भुयारी गटार योजना का कार्यान्वित होत नाहीत, या योजनांची सद्यस्थिती काय आहे आणि या स्थितीची जबाबदारी कोणाची, याचे श्रेय कोणाचे, यासंदर्भातील जनतेच्या प्रश्नांची सर्व प्रस्थापित दिवट्यांनी व प्रस्थापित लोकप्रतिनिधींनी समोर येऊन उत्तरे द्यावीत. इतर मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींचा बीड शहराच्या विकास कामांमध्ये शून्य सहभाग आहे. त्यांचे या बीड शहरांमध्ये कसलेही योगदान नाही. त्यांनी आपल्या मतदारसंघातील नगरपालिका चांगल्या सांभाळाव्यात तिथेही खूप मोठी दुर्दशा आहे. तिथल्या गैरकारभाराची भांडी फोड करण्याची वेळ आमच्यावर आणू नका. इतर मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींनी फक्त आपल्याच मतदारसंघातील नगरपालिका नीट सांभाळाव्यात, बीड शहरांमध्ये नाक खुपसण्याची गरज नाही. तुमच्या नगरपालिकेतील गैरकारभाराचे वाभाडे काढायला आम्हाला वेळ लागणार नाही. धानोरा रोडच्या विकासासाठी जो निधी मंजूर झाला आहे त्याचे श्रेय फक्त स्थानिक जनतेच्या आंदोलनालाच आहे. तरी सर्व श्रेय लाटू प्रस्थापित दिवट्यांनी व लोकप्रतिनिधींनी याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नका, असे बीड शहर बचाव मंचाच्यावतीने ठणकावून सांगण्यात येत आहे.

# यश ढाका याच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करा

प्रतिनिधी । माजलगांव

बीड जिल्ह्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असून अलीकडेच घडलेल्या खून प्रकरणात गुन्हेगारी टोळीचा सहभाग समोर आल्याने संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर माजलगाव तालुक्यातील विविध पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन देत संबंधित आरोपींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, बीड शहरातील टोळक्यांमधील वादातून झालेल्या खून प्रकरणात यश बाम्ब या युवकाचे नाव प्रमुख आरोपी म्हणून समोर आले आहे. या घटनेने समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आरोपीसह त्याच्या टोळीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात



गुन्हेगारी टोळीवर कारवाईची मागणी

आली. पत्रकार संघटनेचे म्हणणे आहे की, वारंवार गुन्हेगारी प्रवृत्तीची प्रकरणे घडत असतानाही दोषींवर कडक कारवाई होत नाही. यामुळे तरुणाची दिशाभूल होऊन गुन्हेगारीकडे वळत आहे. त्यामुळे मुख्य आरोपीसह इतर आरोपींना तात्काळ अटक करून कायद्यानुसार योग्य ती शिक्षा व्हावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

निवेदन द्वारे माजलगाव तालुक्यातील विविध पत्रकारांनी सह्या केल्या असून, या मागणीची लवकर दखल घेऊन प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

## खंडेश्वरी देवी मंदिरामध्ये सप्त चंडी यज्ञाची मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असून

# भाविकांची श्री योग्यनारायणच्या दर्शनासाठी व श्री खंडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी होत आहे

प्रतिनिधी । बीड

बीड जिल्ह्याचे ग्रामदैवत असलेले माता श्री खंडेश्वरी देवी या ठिकाणी घटस्थापनेच्या निमित्ताने मराठवाड्या सह आता महाराष्ट्र मधून देखील विविध जिल्ह्यातील भाविक भक्त नवसाला पावणाऱ्या श्री खंडेश्वरी देवीच्या दर्शनाला येत आहेत याच पार्श्वभूमीवर दरवर्षी नवचंडी यज्ञ केला जातो परंतु या वर्षी मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये सर्वांच्या सहमतीने सप्त चंडी यज्ञास मोठ्या उत्साहात शनिवारपासून आनंदाच्या वातावरणात सुरुवात झाली आहे आजचा तिसरा दिवस असून सल्लग पाच दिवस हा सप्तचंडी महा यज्ञ चालणार आहे या यज्ञाचे पुरोहित मुख्य पुरोहित म्हणून ब्रह्मदेवाच्या स्वरूपात श्री वेद शास्त्र संपन्न श्री घनश्याम जोशी देवा दिंद्रुडकर तसेच त्यांचे सर्व सहकारी पुरोहित ब्रह्मवृंद सप्तचंडी यज्ञासाठी श्री खंडेश्वरी देवी मंदिरामध्ये उपस्थित आहेत श्री पवित्र श्री ब्रह्म वृंदांच्या श्री पवित्र वेद मंत्राच्या



जयघोषाने खंडेश्वरी परिसर दुमदुमला असून सर्व भक्तीमय वातावरण आनंदमय वातावरण सध्या श्री खंडेश्वरी देवी परिसरामध्ये पाहायला मिळत आहे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन देखील मंदिर ट्रस्टीच्या वतीने करण्यात आलेले आहे या ठिकाणी पोता वाले परड्यावाल्या माता-भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित असून त्यांची देखील येथे येणाऱ्या भाविक भक्तांकडून सन्मानपूर्वक पूजा अर्चा करून त्यांना यथाशक्ती दान दक्षिणा देण्यात येत आहे मंदिर ट्रस्टीच्यावतीने या ठिकाणी बाहेर देखील सीसीटीव्ही कॅमेरे स्थापन करण्यात आले आहेत कुठेही काही अनुचित प्रकार घडू नये कोणत्याही महिलांच्या गळ्यातले डाग दागिने चोरीला जाऊ नये तसेच कोणताही भाविक भक्ताला त्रास होऊ नये तसेच विशेष करून महिला भाविक भक्तांना कुठलाही त्रास होऊ नये या साठी बीड जिल्हा मा पोलीस अधीक्षक नवनीत कावंत साहेब यांनी विशेष पोलीस पथक देखील या ठिकाणी तैनात केले आहेत विशेष करून महिलांची काळजी घेण्यासाठी महिलांना कुठलाही त्रास होऊ नये महिलांना व्यवस्थित देवीचे दर्शन घेण्यासाठी रांगेमध्ये उभा रहा हे सांगण्यासाठी बीड जिल्हा मुख्यालयातील लेडी सिंघम महिला पोलीस कर्मचारी मोहिनी पवार मॅडम तसेच दबंग महिला पोलीस कर्मचारी कांचन बहिरवाळ मॅडम तसेच महिला पोलीस कर्मचारी प्रियंका मॅडम सह त्यांच्या समवेत त्यांच्या सर्व सहकारी महिला पोलीस कर्मचारी उपस्थित आहेत तसेच मंदिर गाभाऱ्यामध्ये सर्व भाविक भक्तांना व्यवस्थित दर्शन देण्यासाठी नयना भाकरे पाटील मॅडम तसेच नयना भाकरे पाटील यांच्या सहकारी मैत्रीण मॅडम या देखील आपली सामाजिक सेवा त्या ठिकाणी आपली बजावत आहेत या उत्कृष्ट पवित्र सुरू असलेल्या पवित्र श्री सप्तचंडी यज्ञामुळे या ठिकाणी अतिशय मंगलमय वातावरण सध्या पाहायला मिळत आहे म्हणून सर्व भाविक भक्तांमधून श्री खंडेश्वरी देवी ट्रस्टी यांच्या उत्कृष्ट या धार्मिक कार्याचे बाबतीत येथे येणाऱ्या सर्व तमाम भाविक भक्तांमधून समाधान व्यक्त होत आहे .

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# कोल्हापूर काँग्रेसच्या वतीने नांदेडातील पूरग्रस्तांसाठी मदत



नांदेड : - काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आवाहनानंतर व आ. सतेज पाटील यांच्या पुढाकाराने मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी कोल्हापूरकरांची मदत कोल्हापूर काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून नांदेड येथे मंगळवार दि.३० सप्टेंबर रोजी मदत दाखल झाली. दरम्यान खा.रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत पाच मिनी टेम्पोतील जीवनावश्यक वस्तूच्या किट हस्तांतरित करण्यात आल्या.

अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात पूर आल्याने अनेकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. यामुळे मदतीचा हात म्हणून शक्य ती मदत मराठवाड्यातील जिल्ह्यातील पूरग्रस्तांना करावी असे आवाहन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले होते. दरम्यान आ. सतेज पाटील यांच्या पुढाकाराने कोल्हापूर येथील मदत कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून नांदेड येथे मंगळवार रोजी पोहचली. जिल्हा काँग्रेस कार्यालय नवा मोंढा नांदेड येथे मदत हस्तांतरित करण्यात आली. जिल्ह्यातील पूरग्रस्तांना नांदेड काँग्रेसच्या माध्यमातून ही मदत पोहचविण्यात येणार आहे. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेंद्र घोडजकर, मसुद खान, शेर अली खान, अब्दुल गफार, रहिम खान, महेश देशमुख तरोडेकर, अजिज कुरेशी, मुन्ना अब्बास, निरंजन पावडे, श्रीनिवास मोरे, सतिश देशमुख तरोडेकर, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, डॉ.करुणा जमदाडे, बापूसाहेब पाटील, माधव पवळे, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, दिपकसिंग हुजुरिया, अंबादास रातोळे, गगन यादव, महेश मगर, संजय वाघमारे, इंजि.नसिम पठाण, ज्योती कदम, अनिल कांबळे, प्रसेनजित वाघमारे, सुरेखा वैद्य, नागराज सुलगेकर, गोविंद पाटील, सिमाँन नागोरे, धनंजय उमरेकर, गौतम सिरसाट, ऋषी देशमुख, प्रकाश दिपके आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विचाराचं सोनं लुटण्यासाठी भगवान भक्ती गडावर लाखोच्या संख्येने उपस्थित रहा - नवनाथ शिराळे

बीड: महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री माननीय नामदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भगवान भक्ती गडावर संपन्न होणाऱ्या दसरा मेळाव्यात विचाराचे सोनं लुटण्यासाठी जिल्ह्यातील भगवानबाबावर श्रद्धा असणाऱ्या व पंकजाताई मुंडे साहेबांवर प्रेम असणाऱ्या जनतेने मोठ्या प्रमाणात भगवान भक्ती गडावर उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष आव्हान नवनाथ शिराळे यांनी केले आहे.



बीड शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने अशोक लोढा यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत बोलत असताना नवनाथ शिराळे यांनी असे आवाहन केले आहे.

दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी आयोजित केलेल्या बैठकीसाठी भाजपचे ज्येष्ठ नेते देविदास नागरगोजे सलीम जहांगीर मीराताई गांजले गणेश लांडे अजय सवाई जयश्रीताई मुंडे शांतिनाथ डोरले डॉ. अभय वनवे विजय चौधरी संध्याकाळी राजपूत प्रीत कुकडेच्या इत्यादी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी देविदास नागरगोजे, अशोक लोढा, अजय सवयी, सलीम जहांगीर, इरशाद शेख यांनी बैठकीस मार्गदर्शन केले . बैठकीत पुढे बोलताना नवनाथ शिराळे असे म्हणाले की भगवान भक्ती गडावरील दसरा मेळावा हा १८ पगड जातीचा दसरा मेळावा असून मुंडे साहेबांनी सुरू केलेली ही परंपरा पंकजाताई च्या रूपाने जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील जनतेला संघर्ष करण्याची प्रेरणा देत असून या मेळाव्याच्या माध्यमातून विचाराचा सोनं लुटलं जातं तेव्हा बीड जिल्ह्यातील तमाम जनतेने मोठ्या प्रमाणात या दसरा मेळाव्यात सहभागी होऊन भगवान बाबांचे आशीर्वाद घ्यावेत अशा प्रकारचे आव्हान भाजपचे जिल्हा उपाध्यकक्ष

यावेळी उपस्थित सलीम जहांगीर अजय सवय शांतिनाथ डोरले बाबुराव परळकर देविदास नागरगोजे सर गणेश लांडे गिरी साहेब ननवरे साहेब डॉक्टर अभय वनवे मीराबाई गांधले संध्या राजपूत जयश्री मुंडे प्रीत कुकडेच्या सौ देशपांडे ताई नागरगोजे साहेब संभाजी सुर्वे गवळी साहेब इरशाद भाई इत्यादी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते



# आ.संदीप क्षीरसागर यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड

### सिनेटच्या सदस्य पदी निवडीनंतर विद्यापीठाच्या बैठकीला उपस्थिती

बीड (प्रतिनिधी) बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाली आहे.

आ.संदीप क्षीरसागर यांची निवड ही विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य यांनी विधानसभेचा प्रतिनिधी कोट्यातून केली आहे. आ.संदीप क्षीरसागर हे विद्यार्थ्यांसाठी आणि सर्वसामान्याच्या मदतीसाठी सतत अग्रेसर असतात. तसेच त्यांनी विविध प्रश्न शासनदरबारी मांडून मार्गी लावले आहेत. या निवडी नंतर विद्यापीठाच्या उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु यांच्या हस्ते आ.संदीप क्षीरसागर यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या या निवडीबद्दल शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक यासह विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. या निवडी बद्दल त्यांनी जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड माझ्यासाठी सन्मानाची आणि अभिमानाची बाब -संदीप क्षीरसागर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी महाराष्ट्र विधानसेचे प्रतिनिधी म्हणून माझी निवड झाली आहे. या निवडीबद्दल मी शासनाचे आभार मानतो.तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठात माझी नियुक्ती होणे ही माझ्यासाठी अत्यंत सन्मानाची आणि अभिमानाची बाब असून या पदाला न्याय देण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील प्रगती व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

# गोदावरीच्या पाण्याने घेरले; खा.सोनवणेंनी पाण्यातून जात पुरग्रस्तांचे पुसले आश्रू

## बैलगाडी, दुचाकीवर बसून घेतल्या नुकसानग्रस्तांच्या भेटी

माजलगाव: आधीच जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नद्या दुथडी वाहत असताना जायकवाडी धरणातून ३ लाख क्यूसेस पाणी सोडण्यात आले. परिणामी, गोदावरीच्या पाण्याने माजलगाव तालुक्यातील अनेक गावांना घेरले आहे. दि.३०सप्टेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी पाण्यात असलेल्या गावात जावून पुरग्रस्तांचे आश्रू पुसले. यावेळी पुराच्या पाण्यातून गावात जाण्यासाठी त्यांनी बैलगडी, दुचाकीचाही वापर केला.



बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबरपासून पाऊस आहे. मध्यल्या काळात अनेकदा अतिवृष्टी झाली. यामुळे सर्वच नद्यांना महापूर आला. नद्यांचे पाणी काही प्रमाणात कमी झाली झाले असताना जायकवाडी धरणातून दोन दिवसांपुर्वी ३ लाख क्यूसेस पाणी सोडण्यात आले. २००६ नंतर पहिल्यांदाच इतके पाणी सोडण्यात आले होते. यामुळे माजलगाव तालक्यातील अनेक गावे पाण्यात आहेत. अनेक गावांना जाण्यासाठी रस्ता राहिलेला नसून मुख्य रस्त्यावर पाणी आहे. दि.३० रोजी सकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी सकाळी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी सुरूवात केली. माजलगाव तालुक्यातील टाकरवण, शेलगावथडी, रिदोरी, कवडगावथडी, राजेगाव, हिवरा, काळेगावथडी, महातपुरी, पुरूषोत्तमपुरी, जायकोचीवाडी, सादोळा आदि गावात भेटी दिल्या. यातील अनेक गावातील रस्त्यावर पाणी आहे. सदरील पाण्यातून जाणे मोठे जिकीरीचे काम आहे. परंतु खा.बजरंग सोनवणे यांनी नागरिकांच्या भेटी घेण्यासाठी कवडगावथडी येथे बैलगाडी वापरली. तर काही ठिकाणी दुचाकीवरून प्रवास करत पाण्यातून वाढ काढली. त्यांनी गावात भेट दिल्यानंतर त्यांनी महिला-पुरूषांशी संवाद साधत, गावात पुर आला, संसार भिजला आहे. यामुळे मोठे नूकसान झाले असून यामुळे कोणीही खचून जाऊ नका. तुम्हाला उभा करण्यासाठी आम्ही सरकारकडून मदत मिळवून देऊ, त्यासाठी मी प्रयत्न करत आहे. गावात ज्यांचे घर पाण्यात गेले आहे, त्यांच्या मदतीने आपणच तातडीने जा, त्यांची अडचण समजून घ्या आणि एकेमकांना मदत करा. सरकारी मदत मिळवून देण्यासाठी आम्ही वेळप्रसंगी लढा उभा करू, पण तुम्हाला एकटे सोडणार नाहीत, असा शब्दही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. यावेळी त्यांच्यासोबत माजलगाव मतदारसंघाचे नेते मोहन जगताप

### तरूण शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

कवडगावथडी येथे खा.बजरंग सोनवणे हे पोहचल्यानंतर एका तरूण शेतकऱ्यांने रस्त्याशेजारी असलेल्या शेतातील पाण्यात उडी मारली. त्याठिकाणी या शेतकऱ्याचे अडीच एक्कर हळदीचे पिक आहे. त्या शेतकऱ्याने पाण्यात बुडी घेवून हळदीचे पिक उपटून दाखवायला आणले. यानंतर त्या तरूणाला आश्रू अनावर झाले. त्याच्या डोळ्यातील आश्रू पाहून खा.बजरंग सोनवणे यांनी तु काळजी करू नको, तुला उभा करण्यासाठी शासन स्तरावरून मदत मिळवून देतो, त्यासाठी मी तुमच्या पाठिशी आहे, असे म्हणून तरूणाला धीर दिला.

# गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

नदीपात्रात कुणीही जाऊ नये


नांदेड : दि.३० सप्टेंबर : दिनांक २७ व २८ सप्टेंबर २०२५ रोजी जायकवाडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये अतिवृष्टी झाल्याने दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ११ वाजता जायकवाडी धरणातून ३,०६,००० क्युसेक्स विसर्ग सोडण्यात आलेला होता. जायकवाडी धरणातून सोडण्यात आलेले पाणी शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पामध्ये साधारणत: ३६ ते ४० तासामध्ये पोहचते. त्यामुळे हा विसर्ग शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पामध्ये ३० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १० ते सकाळी ६ वाजेच्या दरम्यान प्राप्त होण्याची शक्यता असून अंदाजे ६ ते ७ तास सलग ३,५०,००० क्युसेक्स प्रमाणे राहण्याची शक्यता आहे. तरी या दरम्यान शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पामधून ३,२५,००० ते ३,५०,००० क्युसेक्स विसर्ग सोडणे अनिवार्य असल्याने नांदेड शहराची धोक्याची पातळी ३५४.०० मी. ओलांडून तो अंदाजे ३५४.२५ मी. जाण्याची शक्यता आहे.

# औरंगाबाद पदवीधर मतदारसंघ मतदार यादी नव्याने तयार करण्याच्या कार्यक्रमास पदवीधर मतदारांनी सहभाग नोंदवावा- जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## पदवीधर मतदारसंघाच्या याद्या नव्याने तयार करण्याबाबतचा कार्यक्रम जाहीर

नांदेड : भारत निवडणूक आयोगाने १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत औरंगाबाद विभागातील पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला असून यामध्ये पदवीधर मतदारांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ मतदार यादी नव्याने तयार करण्याबाबत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, नायब तहसिलदार नितेशकुमार बोलोलू, इंद्रजीत गरड आदीची उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी सांगितले, भारत निवडणूक आयोगाचे १२ सप्टेंबर २०२५ चे पत्रान्वये १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर मतदारसंघाच्या याद्या नव्याने तयार करण्याबाबतचा कार्यक्रम जाहीर झाला असून मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (३) अन्वये जाहीर सूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक मंगळवार ३० सप्टेंबर २०२५. मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची प्रथम पुनप्रसिध्दी बुधवार १५ ऑक्टोंबर २०२५. मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१ (४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची द्वितीय पुनप्रसिध्दी शनिवार २५ ऑक्टोंबर २०२५. नमुना १८ किंवा १९ द्वारे दावे स्विकारण्याचा अंतिम दिनांक गुरुवार ६ नोव्हेंबर २०२५. हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई गुरुवार २० नोव्हेंबर २०२५. मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी. दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५ ते बुधवार १० डिसेंबर २०२५. गुरुवार २५ डिसेंबर २०२५ रोजी दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे. मंगळवार ३० डिसेंबर २०२५ रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करणे असा तपशिल आहे असे त्यांनी सांगितले.

मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३१ (३) नुसार मतदार नोंदणी अधिकाऱ्यांपैकी प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी पदवीधर मतदार संघाचे यादीत नाव नोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीने मतदार नोंदणी अधिनियम १९६० नुसार नमुना १८ मध्ये संबंधित पदनिर्देशित अधिकारी यांचेकडे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी पाठवावा किंवा पोहचवावा.

पदवीधर मतदार संघाची मतदार यादी प्रत्येक निवडणुकीपूर्वी नव्याने तयार करणे आवश्यक असल्यामुळे या मतदार संघातील सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार यादीत ज्या व्यक्तींची नावे समाविष्ट आहेत अशा सर्व व्यक्तींनी सुध्दा विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करावा.

पदवीधर मतदार संघासाठीची अर्हता :

जो व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदार संघातील सर्वसाधारण रहिवासी आहे आणि १ नोव्हेंबर २०२५ पूर्वी किमान ३ वर्ष भारताच्या राज्यक्षेत्रातील विद्यापीठाची एकतर पदवीधर असेल किंवा त्याच्याशी समतुल्य असलेली अर्हता धारण करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास पात्र आहे. ३ वर्षाचा कालावधी हा ज्या दिनांकास अर्हता पदवी परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला असेल आणि तो विद्यापिठ किंवा अन्य संबंधित प्राधिकरण यांच्याकडून प्रसिध्द करण्यात आला असेल त्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

अर्जदाराने अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेल्या आणि अतिरीक्त पदनिर्देशित अधिकाऱ्याने यथोचितरित्या अधिप्रमाणित केलेल्या त्यांच्या पदवी गुणपत्रिका याची प्रत, सोबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे अर्जदाराने अर्जासोबत पासपोर्ट फोटो लावणे आवश्यक आहे. अर्जदाराने अर्जासोबत आधार कार्ड निवडणूकीचे ओळखपत्र व प्रमाणित छायाचित्र ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. शासकीय कर्मचारी असल्यास नमुना सी मध्ये सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.आधारकार्ड जोडने मतदाराच्यावतीने ऐछीक आहे.

भारत निवडणुक आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासन, विधी व न्याय मंत्रालयाच्या अधिसूचना १७ जून २०२२ अन्वये पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठीच्या अर्जाचा अनुक्रमे नमुना क्र. १८ यामध्ये सुधारणा केलेल्या असून सदर सुधारणा १ ऑगस्ट २०२२ पासून लागू आहेत. तसेच सदर नमुना क्र.१८ अर्जात आधार क्रमांकासाठी रकाना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तथापि, आधार क्रमांक सादर करणे हे मतदारांच्या वतीने ऐच्छिक आहे आणि मतदाराने अर्जात आधार क्रमांक नमूद केलेला नाही या कारणास्तव अर्ज नाकारु नये, असेही आयोगाने स्पष्ट केलेले आहे.

# वडवणीचे समुद्र विज्ञान शास्त्रज्ञ डॉ.विलास फरताडे यांचा अटकेपार झेंडा

वडवणी (प्रतिनिधी):- मूळचे बीड जिल्ह्यातील वडवणी येथील रहिवासी असणारे व सध्या गोवा राज्यामध्ये समुद्र विज्ञान संशोधन शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असलेले डॉ.विलास भागवत फरताडे यांना चीन सरकारच्या चायनीज अकॅडमी ऑफ सायन्सेस यांच्याकडून प्रतिष्ठित पोस्ट डॉक्टराल फेलोशिप मिळाली आहे. त्यांच्या पुढील संशोधनासाठी त्यांचे दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्थेत निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर अशाप्रकारे सर्वोच्च यश गाठणारे डॉ.विलास भागवत फरताडे हे बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील एकमेव असावेत. त्यांच्या रुपाने महाराष्ट्राचा झेंडा आता चीनमध्ये अटकेपार फडकला जाणार यात शंका नाही. त्यांच्या या यशाचे वडवणीतील मित्र परिवाराकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील भागवतराव फरताडे यांनी अतिशय संघर्षातून व घरी अठराविश्व दारिद्र्याची गरीबी असतानाही आपल्या दोन्ही मुलांना वेळप्रसंगी स्वतःच्या पोटाला चिमटा देवून अक्षरशः मजूरी करुन उच्चशिक्षित केले. त्यांच्या दोन्ही मुलांनीही आपल्या आई वडिलांच्या या त्यागाला समर्पक अशी गरुड झेप घेवून त्यांचा तो त्याग सत्कारणी लावत त्याला मुकूटमणी लावला आहे. भागवतराव फरताडे यांचे ज्येष्ठ चिरंजीव विश्वजीत फरताडे हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड पोलीस स्टेशन याठिकाणी पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असून त्यांचे कनिष्ठ चिरंजीव डॉ.विलास फरताडे हे सध्या गोवा राज्यामध्ये समुद्र विज्ञान संशोधन शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. या दोन्ही मुलांच्या माध्यमातून केवळ त्यांच्या परिवारालाच नाही तर संपूर्ण वडवणीला सर्वत्र नावलौकिक मिळाला आहे. कोणालाही अभिमान वाटावा व कोणाचीही छाती गर्वाने फुलून यावी अशीच काहीशी कामगिरी या दोन्ही रत्नांनी केलेली आहे. डॉ.विलास फरताडे यांना नुकतीच गोव्याच्या सीएसआयआर नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ओशनोग्राफी येथून डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आलेली आहे. दक्षिण चीन समुद्र महासागरशास्त्र संस्था ही आशियातील एक अग्रगण्य सागरी संशोधन संस्था आहे. येथे आधुनिक प्रयोगशाळा प्रवाळ संवर्धनासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि बहूविषयक संशोधन सुविधा उपलब्ध आहेत. ही संस्था सागरी जीवनाचे संरक्षण व अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळखली जाते. डॉ.विलास फरताडे यांचे संशोधन प्रवाळांच्या आरोग्यावर केंद्रित आहे. प्रवाळ हे किनाऱ्यांना नैसर्गिक संरक्षण देतात. वादळ आणि लाटांपासून त्यांना सुरक्षित ठेवतात. समुद्रातील हवामान संतुलित ठेवतात आणि माणसांच्या जीवनासाठी आवश्यक सागरी संसाधन टिकवतात. जर प्रवाळच नष्ट झाले तर पाणी, हवामान आणि माणसाच्या रोजच्या उपजीविकेवर यांचा गंभीर परिणाम हा होवू शकतो. आज हवामान बदल आणि प्रदूषण यासारख्या कारणांमुळे प्रवाळ हे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जो मानवी जीवनासाठी सर्वात मोठा धोकादायक इशारा आहे. डॉ.विलास फरताडे याच प्रवाळांवरील ताण लवकर ओळखण्यासाठी नविन पध्दत विकसीत करत आहेत. मागील अनेक काळापासून यावर त्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास सुरु असून संशोधन केले जात आहे.

# शासकीय जमिनी खरेदी करणाऱ्या मॅनेजरवर कार्यवाही बाबत मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल -अँड नरसिंह जाधव

## पाटोदा प्रतिनिधी,या याचिकेमध्ये प्रतिवादी केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, ऊर्जा विभाग यांच्यासहित अकरा प्रतिवादींना नोटीस

महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांनी दिनांक २१/१०/२०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय उपविभागीयस्तरी समितीची स्थापना करून पवन ऊर्जा प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमीन खरेदी संदर्भामध्ये तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समिती स्थापन केलेली होती दिनांक ३०/०६/२००५ च्या धोरणानुसार राज्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प राबविण्यासाठी खाजगी कंपन्यांना ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिनव्याजी असे अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत देण्याचे नियम ठरले होते. सदरील योजनेअंतर्गत पाटोदा तालुका येथे रेणू ग्रीन एम.एच.पी प्रायव्हेट लिमिटेड दिल्ली या कंपनीद्वारे प्रकल्पासाठी संपादित जमिनी संदर्भामध्ये तालुका स्तरीय उपविभागीय अधिकारी यांची समिती जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करत असून सदरील समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी असून त्यांनी सदरील कंपनीसाठी जमीन अधिग्रहन करून उपलब्ध करून देणे अभिप्रेत असून त्यामध्ये संबंधित शेतकऱ्यांना नोटीसा काढून लागणाऱ्या जमिनीची संयुक्त मोजणी करणे त्यानंतर तालुकास्तरीय समितीने मोबदला वाटप करणे हे सर्व नियम असताना देखील पाटोदा तालुक्यामध्ये वरील शासन निर्णयाप्रमाणे कुठली कारवाई न करता कंपनीच्या वतीने थेट एजंट द्वारे अथवा गुंड मार्फत शेतकऱ्यांना धमक्या देऊन जमिनी खरेदी करण्यात आल्या अनेक ठिकाणी शासकीय जमिनी तसेच इनाम जमिनी देखील शासनाच्या परवानगी न घेता सदरील कंपनीने जमिनी अधिग्रहित केल्याच्या तक्रारी पाटोदा तालुक्यामध्ये आल्या होत्या. धनगर जवळका येथील ग्रामपंचायत यांनी लावलेली झाडे तसेच रस्ते व शासकीय तलावांमधील जमिनीमध्ये बेकायदेशीर पणे पवनउर्जा टावर उभे करणे, सदरील काम चालू असताना शेतकऱ्यांनी सदर बाबींना विरोध करून संबंधित अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी तसेच ऊर्जा विभागाकडे तक्रारी केल्या होत्या एवढेच नाही तर धनगर जवळका येथील गट नंबर ८ अ मधील शासनाने गाव तलावासाठी पूर्वीच संपादित केलेली जमीन ज्या संबंधित शेतकरी यांना ७१,८१,९६८ रुपये मिळाले परंतु सदरील जमीन सातबारा शासनाच्या मालकीच न लागल्यामुळे त्याचा गैरफायदा घेऊन संबंधित शेतकरी व कंपनीचे मॅनेजर यांनी संगणमत करून सदरील शासनाची जमीन परत खरेदी खताद्वारे कंपनीला विकली तसेच त्याचे नोंदणी खरेदीखत देखील केले व कंपनीच्या वतीने ९६ लाख रुपये देण्यात आले एवढेच नाही तर शासनाच्या नियमाप्रमाणे काम सुरू करण्यापूर्वी वेगवेगळ्या विभागांच्या उदाहरणार्थ वनविभाग, पाटबंधारे, प्रदूषण विभाग अशा विविध विभागाच्या ना हरकत घेतल्यानंतरच सदरील जमिनीचा वापर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी करणे आवश्यक असताना देखील कुठलीच परमिशन न घेता बेकायदेशीरपणे शासकीय रोड खोडने, रोडच्या बाजूची झाडे तोडणे, शासनाला गौण, खनिज पैसे न भरणे याबाबत ही देखील तहसीलदार पाटोदा यांनी वारंवार सदरील कंपनीला नोटीस दिलेल्या होत्या परंतु त्यांच्यावर कुठलीही कारवाई झाली नाही एवढेच नाही तर सदरील कंपनीचे मॅनेजर बेकायदेशीर काम करत असल्याबाबत त्यांच्यावर रितसर गुन्हा दाखल करण्यात यावा याबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग बीड यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी पाटोदा यांना देखील कळवले होते व त्यानंतर अपर जिल्हा दंडाधिकारी बीड यांनी देखील पोलिस अधीक्षक बीड यांना संबंधित प्रकरण मे.रेणूग्रीन लिमिटेड या कंपनी प्रकल्पासाठी शासनाच्या जागेवर अनधिकृतपणे प्रकल्पाचे काम केले आहे. त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी असे पत्रही दिले होते परंतु त्या प्रकरणात कुठलीच कारवाई होत नव्हती. संबंधित प्रकरणांमध्ये कारवाई करण्यासाठी श्री. सुरेश बिभीषण काळे पाटोदा, शिवभूषण लक्ष्मणराव जाधव माजी अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पाटोदा, तसेच मुकुंद दादाराव शिंदे पाटोदा उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका अध्यक्ष यांनी केंद्र सरकार, सचिव ऊर्जा विभाग महाराष्ट्र शासन, महासंचालक उर्जा विभाग मुंबई, कार्यकारी संचालक उर्जा विकास विभाग पुणे, कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मुंबई, विभागीय आयुक्त छ. संभाजीनगर,जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार पाटोदा, या सर्वांना तक्रारी करून संबंधित प्रकरणात शासनाची जमीन विक्री करून लाखो रुपये बेकायदेशीर रुपये मिळवणाऱ्या शेतकऱ्यावर व संबंधित कंपनीचे मॅनेजरवर गुन्हा नोंदवावा, संपूर्ण प्रकल्पाची चौकशी करावी व कंपनीवर देखील कारवाई करावी अशी विनंती केली होती. बीड जिल्यातील पवनऊर्जा कंपनीसाठी जमिनी अधिग्रहण करतांना शासनाच्या मार्गदर्शक सुचनाचे पालन न केल्यामुळे खंड्ण्याचे प्रकार वाढून अशा एका प्रकरणात हकनाक संतोष देशमुख या सरपंचाची हत्या झाली हि बाब नमूद करून प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे असे गंभीर प्रकार झाल्याचे या याचिकेत नमूद केले आहे. त्याबाबत कुठलेही कारवाई न झाल्यामुळे नाईलाजास्तव सुरेश काळे, शिवभूषण जाधव, मुकुंद दादाराव शिंदे यांनी ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये जनहितार्थ याचिका क्र. ९३ ऑफ २०२४ दाखल केली होती व संबंधित प्रकरणांमध्ये सखोल



चौकशी करण्याचे आदेश देऊन संबंधितावर पुढील कारवाई करावी याबाबतची विनंती केली होती. सदरील याचिकेचे सुनावणी दिनांक २८/०९/२०२५ रोजी माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये झाली असता मा. उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती मनीष पितळे व वाय.जि.खोब्रागडे यांनी सदरील याचिका जनहितार्थ याचिका म्हणून दाखल करून खालील प्रतिवादींना १. केंद्र सरकार २. सचिव ऊर्जा विभाग महाराष्ट्र शासन ३. महासंचालक उर्जा विभाग मुंबई ४. उर्जा विकास विभाग पुणे ५. कार्यकारी संचालक उर्जा विकास विभाग पुणे ६. कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबई ७.विभागीय आयुक्त छ.संभाजीनगर ८.जिल्हाधिकारी बीड ९. तहसीलदार पाटोदा १०. प्रकल्प कार्यकारी अधिकारी महा ऊर्जा बीड ११. मे. रेणू ग्रीन एम.एच.पि. प्रायव्हेट लिमिटेड मा. उच्च न्यायालयाने नोटीस काढलेल्या आहेत व याचिकेची सुनावणी दिनांक २१.११.२०२५ रोजी ठेवलेली आहे.

याचिकाकर्त्याच्या वतीने ड. नरसिंह लक्ष्मनराव जाधव यांनी काम पहिले तर केंद्र शासनाच्या वतीने ड. ए. जी. तल्हार(सॉलिसिटर जनरल) यांनी काम पहिले व राज्य शासनाच्या वतीने ड. ए. आर. काळे यांनी काम पहिले.

# अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकरी नागरिकांच्या मदतीसाठी सहाय्यता समिती स्थापन करणार - आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे मोठा फटका बसला असून त्यांचे भूत न भूतो न भविष्यती नुकसान झाले आहे. त्यामुळे या अस्मानी संकटामुळे बाधित झालेल्या सर्वसामान्य नागरिक शेतकरी शेतमजूर यांच्या कुटुंबीयांचे आगामी सहा महिन्याकरता मदत करण्याचा आमचा उद्देश असून यासाठी समाजातील सर्वसमावेशक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना ते पुढे म्हणाले की, हवामानातील अचानक बदलामुळे झालेल्या अतिवृष्टी मुळे आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकरी यांच्या शेतीचे, घरांचे, पिकांचे, कांदा चाळीचे नुकसान झाले असून सर्वसामान्य नागरिकांच्या घरातील वस्तूंचे अतोनात नुकसान झाले आहे. या अस्मानी संकटामुळे त्यांचे न भूतो न भविष्यती नुकसान झालेले आहे. काही शेतकऱ्यांना एक गुंठा ही जमीन शेती योग्य राहिली नसून यावर्षी खरीप हंगामामध्ये त्यांना उत्पन्न मिळणार नाही. सद्यस्थितीमध्ये तात्पुरती मदत म्हणून अनेक संस्था अनेक सेवाभावी संस्था यांचे वतीने मदत



कार्य सुरू आहे, परंतु ही व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात करण्याऐवजी या पूरग्रस्त अतिवृष्टी ग्रस्त बाधित कुटुंबीयांना आगामी सहा महिन्यापर्यंत सहाय्यता देण्याची आवश्यकता आहे. हे लक्षात घेऊन व्यापक स्वरूपात अर्थसहाय मदत रूपाने गोळा करावी लागणार आहे. या मदत कार्यासाठी सर्वसमावेशक सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार असून आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील विविध संस्था, पतसंस्था, सेवाभावी संस्था, विश्वस्त संस्था, देवस्थान, शासकीय कर्मचारी, पदाधिकारी, व्यापारी, यांचेकडून ऐच्छिक स्वरूपात मदत मिळावी अशी अपेक्षा असून या प्रक्रियेमध्ये जी संस्था अथवा व्यक्ती सर्वोच्च अर्थसहाय्य जाहीर करील त्यापेक्षा ज्यादा माझी वैयक्तिक मदत त्यामध्ये असणार आहे. या सर्व मदत कार्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी या समितीचे गठन करण्यात येणार आहे. याबाबत चर्चा केली असता श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव २१ लक्ष रुपये, कृषी उत्पन्न बाजार समिती पाच लाख रुपये, आष्टी तालुका दूध उत्पादक संघ पाच लक्ष रुपये, धनश्री सहकारी पतसंस्था एक लक्ष रुपये अशा प्रकारे आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. ज्या दानशूर व्यक्तींना या सामाजिक कार्यामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी यथाशक्ती अर्थसहाय्य करून या मदत यज्ञामध्ये आपला सहभाग असे आवाहनही त्यांनी शेवटी केले आहे.

# यावर्षीचा श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड दसरा मेळावा स्थगित – आ.सुरेश धस

आष्टी – ( प्रतिनिधी ) गेल्या काही दिवसांपासून राज्यातील पूरपरिस्थिती आणि शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान पाहता यंदाचा श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील दसरा मेळावा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून केवळ पारंपरिक पूजन आणि गडावर समाधी बांधकामाच्या शिलारोहन कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष आ. सुरेश धस यांनी दिली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मराठवाड्यात अतिवृष्टीने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. यामध्ये आष्टी विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पुरात अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टर व बोटींच्या साह्याने स्थलांतरित करण्याची वेळ यावेळी ओढवली आहे. ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या तुलनेत दीडपट जास्तीचा पाऊस झाल्यामुळे जोमात आलेले खरीप हंगामातील पीक आडवे झाले. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून वाहून गेलेल्या आहेत. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू झालेल्या



पिकांचा चिखल केला. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना ज्या माध्यमातून मदत करता येईल त्याप्रमाणे सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न माझ्याकडून करत आहे. त्याच पार्श्वभूमीवर यंदा मच्छिंद्रनाथ गड सावरगाव येथे सालाबाद प्रमाणे होणारा दसरा मेळावा रद्द करण्याचा निर्णय देवस्थान ट्रस्टच्या वतीने घेण्यात आलेला असून विजयादशमीच्या दिवशी सकाळी साडेअकरा वाजता गडावर सुरू असलेल्या श्री मच्छिंद्रनाथांच्या समाधीच्या बांधकामाचा शिलारोहण कार्यक्रम करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष आ. सुरेश धस यांनी दिली.



आष्टी – (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते भगवानराव शिनगीरे व अरुणजी पडोळे यांचा उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी ठोंबरे मुख्यकार्यकारी अधिकारी बीड, तोटावार जिल्हा उपनिबंधक बीड, अशोकरावजी कदम औसाचे सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी शिनगिरे यांच्यासोबत अरुण पडोळे, वैजिनाथ निर्मळ, जेष्ठ तपासणीस आष्टी तालुका शरदजी आजबे, महेश कोकणे, नवनाथ वाघोले हे उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकरी नागरिकांच्या मदतीसाठी सहाय्यता समिती स्थापन करणार - आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे मोठा फटका बसला असून त्यांचे भूत न भूतो न भविष्यती नुकसान झाले आहे. त्यामुळे या अस्मानी संकटामुळे बाधित झालेल्या सर्वसामान्य नागरिक शेतकरी शेतमजूर यांच्या कुटुंबीयांचे आगामी सहा महिन्याकरता मदत करण्याचा आमचा उद्देश असून यासाठी समाजातील सर्वसमावेशक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना ते पुढे म्हणाले की, हवामानातील अचानक बदलामुळे झालेल्या अतिवृष्टी मुळे आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकरी यांच्या शेतीचे, घरांचे, पिकांचे, कांदा चाळीचे नुकसान झाले असून सर्वसामान्य नागरिकांच्या घरातील वस्तूंचे अतोनात नुकसान झाले आहे. या अस्मानी संकटामुळे त्यांचे न भूतो न भविष्यती नुकसान झालेले आहे. काही शेतकऱ्यांना एक गुंठा ही जमीन शेती योग्य राहिली नसून यावर्षी खरीप हंगामामध्ये त्यांना उत्पन्न मिळणार नाही. सद्यस्थितीमध्ये तात्पुरती मदत म्हणून अनेक संस्था अनेक सेवाभावी संस्था यांचे वतीने मदत कार्य सुरू आहे, परंतु ही व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात करण्याऐवजी या पूरग्रस्त अतिवृष्टी ग्रस्त बाधित कुटुंबीयांना आगामी सहा महिन्यापर्यंत सहाय्यता देण्याची आवश्यकता आहे. हे लक्षात घेऊन व्यापक स्वरूपात अर्थसहाय मदत रूपाने गोळा करावी लागणार आहे. या मदत कार्यासाठी सर्वसमावेशक सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार असून आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील विविध संस्था, पतसंस्था, सेवाभावी संस्था, विश्वस्त संस्था, देवस्थान, शासकीय कर्मचारी, पदाधिकारी, व्यापारी, यांचेकडून ऐच्छिक स्वरूपात मदत मिळावी अशी अपेक्षा असून या प्रक्रियेमध्ये जी संस्था अथवा व्यक्ती सर्वोच्च अर्थसहाय्य जाहीर करील त्यापेक्षा ज्यादा माझी वैयक्तिक मदत त्यामध्ये असणार आहे.

या सर्व मदत कार्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी या समितीचे गठन करण्यात येणार आहे. याबाबत चर्चा केली असता श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव २१ लक्ष रुपये, कृषी उत्पन्न बाजार समिती पाच लाख रुपये, आष्टी तालुका दूध उत्पादक संघ पाच लक्ष रुपये, धनश्री सहकारी पतसंस्था एक लक्ष रुपये अशा प्रकारे आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. ज्या दानशूर व्यक्तींना या सामाजिक कार्यामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी यथाशक्ती अर्थसहाय्य करून या मदत यज्ञामध्ये आपला सहभाग असे आवाहनही त्यांनी शेवटी केले आहे.

# नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान अंतर्गत आष्टी येथे आज भव्य मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर

आष्टी (प्रतिनिधी) मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष व जिल्हा प्रशासन तसेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महेश आयुर्वेद कॉलेज अँड हॉस्पिटल, आष्टी यांच्या समन्वयाने आज दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान अंतर्गत भव्य मोफत नेत्र विकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.




हे शिबिर सकाळी ११ वाजता महेश आयुर्वेद हॉस्पिटल, गंगाईनगर, मुर्शदपूर, आष्टी येथे पार पडणार आहे. या शिबिराचे अध्यक्षस्थान माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब भूषवणार असून प्रमुख पाहुणे म्हणून राजेशजी अ. सासने साहेब (धर्मादाय सह आयुक्त लातूर विभाग, लातूर) , प्रदीपजी म. चौधरी साहेब (धर्मादाय उप आयुक्त, बीड) तसेच डॉ. अजय दादा धोंडे ( सिनेट सदस्य डॉ. बा. आं. म. विद्यापीठ छ. संभाजीनगर तथा संस्था सहसचिव) हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.शिबिराचे वैशिष्ट्ये – डॉ. चंद्रकांत गोसावी एम. एस. नेत्र तज्ञ यांच्याकडून मोफत नेत्र तपासणी – नेत्र तपासणीसाठी आवश्यक आधुनिक उपकरणांची सुविधा रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा – या शिबिरात डोळ्यांची प्राथमिक तपासणी, चष्म्याचा नंबर काढणे, तसेच गरजू रुग्णांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सोय करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या शस्त्रक्रियेसाठी लागणारा सर्व खर्च मोफत असून रुग्णांना औषधे व आवश्यक सुविधा तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखी खाली दिल्या जाणार आहेत.डोळ्यांची काळजी घेण्यासाठी मार्गदर्शन – डोळ्यांमध्ये जळजळ, सूज, सतत पाणी येणे, धूसर दिसणे, उजेडात किंवा धुरात त्रास होणे, डोळ्यांत वेदना होणे, दृष्टी कमी होणे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून अशा रुग्णांना योग्य मार्गदर्शन करून तातडीने आवश्यक उपचार केले जाणार आहेत.आयोजकांचे आवाहन – शिबिराचा लाभ सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी घ्यावा.

# महाविद्यालयीन जीवनातच स्वत:ची ओळख निर्माण करा– ऍड. रुक्मीण बागल

माजलगाव (प्रतिनिधी)

महाविद्यालयीन जीवनातच स्वतःची ओळख निर्माण करायला हवी असे प्रतिपादन विधीज्ञ ऍड. रुक्मीण बागल यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालय अंतर्गत तक्रार निवारण समिती व सखी सावित्री समिती यांच्या वतीने नवरात्र निमित्त महाविद्यालयात दिवस तुझे हे फुलायचे या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.




अध्यक्षस्थानी स्त्री रोग तज्ञ डॉ. प्रज्ञा जोशी या तर अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. प्रेमनंदा घडसिंग, सखी सावित्री मंचच्या प्रमुख प्रा. सुवर्णा पांचाळ उपस्थित होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आजच्या काळात शिक्षण व करिअरवर आपण जास्त लक्ष देण्याची गरज आहे आजचा जमाना हा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए. आय.) चा आहे. ज्ञान हे आपल्या दारामध्ये येऊन उभा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मग त्याचा सदुपयोग करायचा की दुरुपयोग करायचा हे आपणच ठरवले पाहिजे. या काळामध्ये आपण योग्य ती खबरदारी व निर्णय घेतले तर भविष्यात आपण नक्कीच यश संपादन करू. अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रज्ञा जोशी म्हणाल्या की, नवरात्र उत्सव हा भारतीय संस्कृतीतील एक अद्वितीय असा सण आहे. या काळामध्ये नऊ दिवस देवीचे उपवास करून लोक देवीची मनोहर भावे प्रार्थना करतात. ज्यामधून आपणास आपली मानसिक व शारीरिक स्थिती संतुलित राखण्याचे काम केले जाते. नवरात्र उत्सव हा नऊ दिवसच का साजरा केला जातो याचे महत्त्व देखील त्यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितले. प्रास्ताविक प्रा.सुवर्णा पांचाळ यांनी केले. सूत्रसंचालन काठूळे ऋतुजा बालासाहेब हिने केले तर आभार प्रा. प्रतिभा जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा. स्वाती साखरे, प्रा. प्रीती कळसणे, प्रा. मंदा मस्के, प्रा.पूजा सिंग, प्रा. पूजा मस्के, सौ. स्वाती धर्माधिकारी, आशा कांबळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# नगरपरिषद अंबाजोगाईच्या वतीने लोककल्याण मेळाव्याचे आयोजन

## प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेतून खेळते भांडवल मिळणार मुख्याधिकारी श्रीमती प्रियांका टोंगे यांची माहिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना (पीएम-स्वनिधी) यांची पुनर्रचना करण्यात आली आहे. सदर योजनेला मार्च - २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अंबाजोगाई शहरातील सर्व स्थिर, फिरता, तात्पुरत्या फेरिवाल्यांना विविध राष्ट्रीयकृत बँकांमार्फत खेळते भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल अशी माहिती नगरपरिषद अंबाजोगाईच्या मुख्याधिकारी श्रीमती प्रियांका टोंगे यांनी दिली. त्या नगरपरिषद अंबाजोगाईच्या वतीने आयोजित लोककल्याण मेळाव्यात बोलत होत्या.

नगरपरिषद अंबाजोगाईच्या वतीने लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. दीनदयाळ जनआजिविका योजना - शहरी (डिजेएवाय-एस) अंतर्गत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना (पीएम-स्वनिधी) या संदर्भात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषदच्या मुख्याधिकारी श्रीमती प्रियांका टोंगे या होत्या, या प्रसंगी स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, तसेच आयसीआयसीआय बँकेचे अधिकारी महेश अंजान, शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे, शहर अभियान व्यवस्थापक समीर शेख इत्यादींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी लोककल्याण मेळाव्यास सिएलएफ, एएलएफचे सर्व पदाधिकारी सदस्य तसेच प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना (पीएम-स्वनिधी) अंतर्गत लाभ घेतलेले लाभार्थी व महिला बचत गटाच्या सदस्या व कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सदरील मेळाव्या मध्ये मुख्याधिकारी यांनी मार्गदर्शन करताना शासनाने दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी बँकांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे तसेच शहरातील फेरीवाल्यांनी (पीएम-स्वनिधी) योजने अंतर्गत घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करावी. आणि बँकेमध्ये आपली पत निर्माण करून अशा शासकीय योजनांचे लाभ शहरातील पात्र लाभार्थींनी घेण्यासाठी पुढे यावे असे आवाहन या प्रसंगी केले. सदरील मेळाव्यामध्ये बँकांमार्फत अनेक लाभार्थींना कर्ज वाटप ही करण्यात आले. शहर अभियान व्यवस्थापक समीर शेख यांनी (पीएम-स्वनिध) योजनेची सविस्तर माहिती दिली व तसेच जास्तीत - जास्त लाभार्थ्यांनी स्वनिधी से सुमृद्धी योजनेचे प्रोफिलिंग करणे बाबत मार्गदर्शन करण्यात आले. दीनदयाळ जनआजिविका योजना-शहरी (डिजेएवाय-एस) योजने अंतर्गत लाभार्थींना घटकनिहाय मिळणारे लाभ यांची सविस्तर माहिती शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे यांनी दिली. कार्यक्रम यशस्वितेसाठी मल्हारी जोगदंड, शहर समन्वयक लखन ओहळ, सोनाली शिंदे, शिवाजी जावीर, तसेच शहरस्तर संघाच्या अध्यक्षा श्रीमती रोहिणी कडेकर, सिआरपी निर्गुण हावळे, सीमा खतीब, मनिषा वाघमारे, प्रियांका राऊत यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. तसेच आनंदी, आदिशक्ती, आईसाहेब, प्रगती, त्रिभुवनी, भाव्या, श्री रेणुका इत्यादी स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या सदस्यांची उपस्थिती होती.




# माल्टा देशाच्या वर्धापन दिनास रसिक कुंकूलोळ यांना अतिथीचा मान



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

रिपब्लिक माल्टा देशाच्या ६१ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबई येथील ओबेरॉय हॉटेल येथे दि.२९ सप्टेंबर रोजी एका समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाईचे भूमिपुत्र उद्योजक रसिक कुंकूलोळ यांना या समारंभासाठी प्रमुख अतिथीचा सन्मान उपलब्ध झाला.या वेळी माल्टा रिपब्लिकचे भारतातील उच्च आयुक्त मी. रियुबेन गौसी व त्यांच्या पत्नी डॉ.ओल्गा गौसी तसेच मुंबई येथील रिपब्लिक माल्टाच्या मानस वाणिज्य हुनमिस, चंद्रा रूईया सरकारी टेल डॉटकॉमचे मुख्य संपादक अमेय साठे उपस्थित होते. यावेळी बोलताना रसिक कुंकूलोळ म्हणाले की, प्रत्येक राष्ट्राने विश्व बंधुत्वाची संकल्पना जोपासल्यास आगामी काळात जगात शांतता नांदेल मानवता व नैतिक मुल्य यांची जोपासना केल्यास कोणत्याही राष्ट्राला प्रगतीकडे जाण्याचा मार्ग सापडतो. असे सांगुन त्यांनी शुभेच्छा दिल्या. अंबाजोगाई येथील भूमिपुत्र उद्योजक रसिक कुंकूलोळ यांना हा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# शिरूर शहरातील पूरग्रस्तांना नाम फाउंडेशनचा आधार

तीस कुटुंबांना दिला किराणा

शिरूर: सिंदफणा नदीला आलेल्या महापुरामुळे प्रभाग क्रमांक नऊ मधील रहिवाशांचे संसार पाण्यात वाहून गेले होते.सदरील रहिवाशांना नाम फाउंडेशनच्या वतीने मदतीचा हात देण्यात आला असून सोमवारी सकाळी त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सिद्धेश्वर संस्थानवर करण्यात आले. नाम फाउंडेशन नेहमीच संकटाच्या काळात उभा राहत असते या नाम फाउंडेशन ची स्थापना ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर व अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी नेहमीच आपली सामाजिक बांधिलकी कलेबरोबर जोपासली आहे. नाम फाउंडेशन ना आतापर्यंत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब, विधवा महिला , नदी खोलीकरण रुंदीकरण , पाझर तलावातील गाळ काढणे, त्याचबरोबर गरीब वंचित मुलांना शिक्षणाच्या प्रवासाने, पशुधनांना चारा पुरविणे, सामूहिक विवाह सोहळे, अजून भरपूर काही मोठ्या प्रमाणावर राज्यातच नव्हे तर राज्याबाहेर सुद्धा मोठ्या प्रमाणावर आपलं सामाजिक दायित्व नाम फाउंडेशन च माध्यमातून हे दोन्हीही अभिनेते करत आहेत साधा मेसेज वरती सुद्धा ही मंडळी दखल घेत असते त्यामुळे राजकीय मंडळीच्या डोळ्यात नाम फाउंडेशनच्या माध्यमातून होणाऱ्या मदतीसाठी झणझणीत एक प्रकारचा अंजनच आहे. अशाच प्रकारे नुकत्याच संपूर्ण मराठवाडा भर झालेल्या पूरग्रस्तांच्या मदतीला सुद्धा नाम फाउंडेशन धावून आले आहे.



# गुरुप्रसाद गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षपदी शरद ढाकणे तर सचीव पदी प्रकाश देसरडा

मानूर /प्रतिनिधी

गुरुप्रसाद गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित,वारणी या संस्थेची बिनविरोध निवडणूक आज दिनांक ५ सप्टेंबर रोजी शहरातील सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयात पार पडली होती.सदरील संस्थेच्या निवडणुकीत माजी राज्यमंत्री तथा आमदार सुरेश धस आणि माजी मंत्री तथा ज्येष्ठ नेते जयदत्त क्षीरसागर यांचे वर्चस्व सिद्ध झाले आहे.तेरा सभासद संख्या असलेल्या या संस्थेत २८ सभासदांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते.त्यापैकी १५ सभासदांनी दुपारी आपले अर्ज मागे घेतले.त्यामुळे सदरील निवडणूक बिनविरोध झाली आहे.१४ मार्च १९८९ या वर्षीची स्थापना असलेल्या संस्थेत मधल्या काळात प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती.त्यामुळे प्रदीर्घ काळापासून या संस्थेचे संचालक मंडळ अस्तित्वात नसल्यामुळे काही सभासदांनी अनामत रक्कम भरून निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यासाठी प्रयत्न केले होते.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जी.बी.वेडे यांनी तर पी.आर.आगे यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले.नव्या सभासद मंडळाची पहिली सर्वसाधारण सभा १४ सप्टेंबर रोजी कार्यालयात झाली असल्याची माहिती प्रशासक पी.आर.आगे यांनी दिली.

सदरील सहकारी संस्थेमध्ये १३ सभासद संख्या असून त्यापैकी सर्वसाधारण गटाला ८ जागा महिला राखीव २ अनुसूचित जाती आणि जमाती १ भटक्या विमुक्त जाती आणि जमाती १ आणि इतर मागास प्रवर्गासाठी १ अशा प्रकारे १३ जागांचे आरक्षण निश्चित करण्यात आले होते.

सदर संस्थेच्या अध्यक्ष पदी शरद ढाकणे तर सचिव पदी प्रकाश देसरडा यांची निवड झाली या पदाधिकाऱ्यांची निवड ३० आक्टोबर रोजी अविरोध निवड करण्यात आली सदरील संस्थेने यापूर्वी चुकीचे प्लॉट वाटप केले होते.त्यामुळे मोठा गोंधळ उडाला होता.काही सभासदांना भुखंड वाटप करण्यात आले नव्हते.त्यामुळे पेच निर्माण झाला होता.आता नवीन सभासदांपैकी व काही सभासदांच्या स्वखुशीने त्यांचे भुखंड रद्द करून नवीन ले आऊट टाकून सर्व सभासदांना नियमाप्रमाणे भुखंड वाटप करण्यात येणार असून कोणावरही अन्याय होणार नाही.

प्रकाश देसरडा -नवनिर्वाचित सचिव, गुरुप्रसाद गृहनिर्माण सहकारी संस्था-

# पूरग्रस्तांच्या मदतीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सेवाभरतीचा हातभार

## संसार उपयोगी साहित्याचे वाटप




पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा परिसरात झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अनेकांच्या घरातील साहित्य वाहून गेले, जगण्याची साधनं नष्ट झाली. अशा कठीण प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा व सेवाभरती संघटनांनी पुढाकार घेत पूरग्रस्त कुटुंबांना संसार उपयोगी साहित्याचे वाटप करून त्यांना दिलासा दिला.या मदत कार्यांतर्गत पूरग्रस्त कुटुंबांनी भांडीकुंडी यासह दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेले साहित्य देण्यात आले. स्वयंसेवकांनी घराघरात पोहोचून हे साहित्य वाटप केले. पूरामुळे हवालदिल झालेल्या कुटुंबांच्या चेहऱ्यावर या मदतकार्यामुळे समाधान व दिलासा दिसून आला. संकटसमयी समाजासाठी योगदान देणे हीच खरी सेवा या भावनेतून संघ व सेवाभरती कार्यकर्ते मदत कार्यात सहभागी झाले. गावकऱ्यांनी त्यांच्या या पुढाकाराचे मनापासून स्वागत करत कौतुक व्यक्त केले.समाजासाठी अखंड सेवा हाच आमचा संकल्प आहे. पूरग्रस्तांसोबत सदैव उभे राहून त्यांना आवश्यक मदत पुरवली जाईल, असे संघ व सेवाभरतीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# जनसुरक्षा कायदा रद्द करा, ओला दुष्काळ जाहीर करा

## या मागणी साठी परळीत उद्या महाविकास आघाडीचे धरणे आंदोलन

### महाविकास आघाडीसह सर्व मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे-बहादुरभाई

परळी /प्रतिनिधी

जनसुरक्षा विधेयक रद्द करा, ओला दुष्काळ त्वरित जाहीर करा, विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करा, अडचणी सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करा बाबत परळीत गुरुवार दि.२ ऑक्टोंबर रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत तरी परळी तालुक्यातील महाविकास आघाडी सह मित्र पक्षाच्या वतीने करणी येणार आहेत या धरणे आंदोलनात महाविकास आघाडीचे नेते कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई, तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे, कॉम्रेड पि.एस. घाडगेसर, एडवोकेट अजय बुरांडे, पांडुरंग राठोड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, शहराध्यक्ष एडवोकेट जीवनराव देशमुख, उत्तम दादा माने, उबाठा गटाचे तालुकाप्रमुख भोजीराज पालीवाल,शहर प्रमुख राजेश विभुते यांनी केले आहे.

महाविकास आघाडीच्या वतीने राज्यभरामध्ये होत असलेल्या धरणे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परळीतही काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट,शिवसेना उबाठा गट, कम्युनिस्ट पार्टी व मित्र पक्षाच्या वतिने गुरुवार दि.२ ऑक्टोंबर रोजी नेहरू चौक (तळ) या ठिकाणी सकाळी १० ते दुपारी २ वाजे पर्यंत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या निदर्शने व धरणे आंदोलनात सह महाविकास आघाडी सह सर्व मित्र पक्षाच्या नेते पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान महाविकास आघाडीच्या वतीने काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर भाई यांनी केली आहे.



# घळाटी नदीवर रूंद व उंच पुल द्या


माजलगाव /प्रतिनिधी: तालुक्यातील घळाटवाडी येथील घळाटी नदीवर रूंदीचा व उंचीच्या पुलास मंजुरी द्या अशी या मागणीचे निवेदन आमदार प्रकाशदादा सोळंके यांना उपसरपंच अनुभाउ घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. २९ सोमवारी देण्यात आले.

तालुक्यातील घळाटवाडी येथील घळाटी नदीला झालेल्या अतिवृष्टीने मोठा पुर आला होता. घळाटी नदीवर कमी उंचीचा व अरूंद असलेला जुना पुल या पुराच्या पाण्याने पुर्णतः वाहुन गेला. परिणामी या पुलावरून ये - जा करतांना जिवघेणी कसरत ग्रामस्थांना करावी लागत होती. त्यामुळे उपसरपंच अनुपभाउ घाडगे यांनी याची दखल घेत घळाटी नदीवर रूंदीचा व उंचीच्या पुलास मंजुरी द्या या मागणीचे निवेदन आमदार प्रकाशदादा सोळंके यांना दिले. यावेळी ज्योतिराम पठाडे, बाबा काटे, दिनकर पठाडे, नवनाथ जाधव, पंडित भुतकर, राजेंद्र भोसले, राजु कुलथे, बाळु जाधव, शाम दराडे यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान ग्रामस्थांना ये - जा करण्यासाठी पर्यायी रस्ता नसल्याने ग्रामस्थांना गैरसोयीचा मोठा सामना करावा लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर पुल द्या अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली.

# लाडक्या बहिणींना दिवाळीला दोन हप्ते द्या

## माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करा- उपसरपंच अनिल राधे कांबळे

माजलगाव /प्रतिनिधी : लाडक्या बहिणींना केवायसी केल्यानंतर हप्ता दिला जाईल असे शासन सांगत आहे परंतु दिवाळीला एकत्रित दोन हप्ते द्या व माजलगावात ओला दुष्काळ जाहीर करून एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या अशी मागणी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी शासनाकडे केले आहे.



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना ई केवायसी करा त्यानंतर लाभ मिळेल असे संकेत शासनाने दिले आहेत परंतु ऐन सणासुदीच्या काळात ई केवायसी चे फर्मान शासनाने काढल्याने अनेक पात्र लाभार्थी महिला वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने दिवाळीनंतर ई केवायसी अनिवार्य करावी व दिवाळीला एकत्रित दोन हफ्त्यांचा लाभ द्यावा तसेच मागील दोन दिवसांपासून अतिवृष्टी व ढगफुटी सारखा पाऊस शहरासह तालुक्यात बरसत आहे. खरीपातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्य शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे करण्यात वेळ न घालवता तात्काळ शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपयांची नुकसान भरपाई द्या अशी मागणीही उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी केली आहे.

# स्त्री शक्ती आणि युक्तीचा संगम,कधी काली कधी चंडी तर कधी दुर्गा आदिमातेचे अवतार अनेक

## प्रसंगानुसार रूपे बदलते ती घराघरात कार्य करत असते स्त्री शक्ती एक

वरील ओळी स्त्रीच्या बाबतीत किती सार्थ आहेत ना.जीवनातल्या अनेक प्रसंगात ती वेगवेगळी रूपे धारण करत असते.कधी काली,कधी दुर्गा तर कधी चंडी.प्रसंगानुरूप ती अनेक अवतार धारण करत असली तरी तिचे मूळ रूप आहे ते मातेचे.घराघरातून ही माता आपल्या मुलांचे संगोपन करत असते. प्रेमळपणाने पालन करत असते आणि हे कार्य करत असताना ती अनेक भूमिका बजावत असते.कितीतरी प्रसंगा मध्ये ती कणखरपणे संकटांचा सामना करते, योग्य निर्णय घेते आणि त्या संकटातून पूर्ण कुटुंबाला तारुण नेते. कधी ती यशाचा आनंदोत्सव सुद्धा साजरा करते.स्त्री ही प्रत्येक कुटुंबाचा आधार असते,मग ते कुटुंब उच्चवर्गीय असो किंवा मध्यमवर्गीय.सर्व स्तरा तील कुटुंबामध्ये स्त्रीच मुख्य भूमिका निभावत असते.पूर्वीचे लोक असे म्हणत की,घरातील स्त्री चांगली असेल तर त्या कुटूंबाला सुख मिळते. घरातील स्त्री ही त्या घराचा मुख्य आधार असते आणि ती जर चांगली असेल,सर्व कुटुंब सांभाळणारी असेल,कर्तुत्ववान असेल तर ते कुटुंब सुखी आणि संस्कारित बनते.त्या कुटुंबाची भरभराट होते.घरातील स्त्री ही कुटुंबाला सावरणारी असेल तर ते कुटुंब गुण्यागोविंदाने नांदत असते.तिथली मुलंही संस्कारित आणि सक्षम बनतात.या गोष्टीची साक्ष देतात ती आपली कथा,पुराणे तसेच इतिहास सुद्धा. आपण पाहतो की अगदी रामायण, महाभारतापासून स्त्रियांनी आपल्या कुटुंबामध्ये महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे.कौशल्येचा राम हा देव जरी असला तरी तो मातेला तितकेचवंदनीय मानतो.तर कैकयी सारख्या स्त्रीचे स्थान कुटुंबामध्ये वेगळे आहे. ती आपल्या वराच्या आधाराने आपल्या पतीला रामासारख्या मुलाला वनवासात ही पाठवू शकते.सीते सारखी स्त्री आपल्या पतीसोबत स्वतःच्या निर्णयाने वनवासात देखील त्याच्या सोबत जाऊ शकते आणि रावना सारख्या बलाढ्य राक्षसाला स्वतः शक्ति च्या बळावर तर कधी युक्तीने त्याला दूर ठेवू शकते.महाभारतामध्ये यशोदेचे स्थान महत्त्वाचे आहे.तिने कृष्णाला घडवले,प्रेम दिले आणि अगदी स्वतःच्या मुला प्रमाणे त्याचे पालन पोषण केले.तसेच देवकी सुद्धा आहे की जिने स्वतः जन्म दिलेल्या मुलाला समाजाच्या आणि कुटुंबाच्या हितासाठी, आपल्या मातृत्वासाठी आपल्यापासून कित्येक वर्ष दूर ठेवलं.इतिहासा तील स्त्रिया जिजामाता यांनी शिवाजी महाराजां सारखा शूरवीर आणि पराक्रमी मुलगा घडवला,ज्याने हिंदवी स्वराज्य स्थापन केले. शहाजीराजांनी दाखवलेला विश्वास त्यांनी सार्थ करून दाखवला.झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने वैयक्तिक सुखदुःख बाजूला ठेवून झाशीची राणी बनून इंग्रजाशी प्रखर लढा दिला. म्हणूनच स्त्रीकडे अशा प्रकारची बुद्धिमत्ता आहे की,जी शक्ती आणि युक्तीने आपल्या चातुर्याचा वापर करून आपले कुटुंब सांभाळत असते,समाज घडवत असते.अहिल्याबाई होळकरांसारखी पराक्रमी स्त्री स्वतःच्या वैयक्तिक सुखाचा विचार न करता राज्याच्या सुखासाठी कणखरपणाने उभी राहते आणि समाजा साठी एक आदर्श स्त्री राज्यकर्ती बनते. सावित्रीबाईं सारखी स्त्री महात्मा फुलेंच्या मार्गदर्शनाखाली एक आदर्श शिक्षिका आणि समाजातील स्त्रियांचे गौरवस्थान,प्रेरणास्थान बनते.तीने शक्तीने व युक्तीने सहनशील होऊन समाजातील कर्मठ लोकाचा त्रास सहन केला,परंतु तिने जिंकून दाखवले.घराघरांमध्ये अशा कर्तुत्वत्वान स्त्रिया सतत कुटुंबात कार्य करत असतात.म्हणूनच अगदी सामान्य स्त्री सुद्धा अगदी उत्तमपणे आपली जबाबदारी पार पाडते.तिच्याकडे ती बुद्धी असते.अगदी स्वतःच्या संसारातले पैसे वाचवून बचत करणारी स्त्री, नवऱ्याच्या आर्थिक संकटामध्ये आपल्या जवळची वाचवलेली पुंजी काढून देऊन पतीला मदत करतेच की,तोही एक युक्तीचाच प्रकार म्हणावा लागेल. ग्रामीण भागातील कित्येक स्त्रिया बऱ्याच वेळेला आपल्या कुटुंबातील सदस्यांचा विरोध पत्करून आपल्या मुलांना अगदी उच्च पदापर्यंत पोहोचवत असतात त्या सुद्धा युक्तीनेच.त्यांना या समयी कित्येक प्रसंगांना तोंड द्यावे लागत असेल त्या स्वतःच जाणोत.अगदी युक्तीनेच आपल्या मुलांना बाह्यकर्षणा पासून दूर ठेवण्यामध्ये त्या यशस्वी होतात आणि मुलांना यशस्वी करून दाखवतात. पतीच्या निधनानंतर खचून न जाता कित्येक स्त्रिया समर्थपणे आपले कुटुब सांभाळतात. एकल महिला आपल्या मुलांची जबाबदारी समर्थपणे पार पाडतात. यावरून हेच लक्षात येते की स्त्री ही खरचं शक्ती आणि युक्तीचा अपूर्व संगम आहे.ती जीवना तल्या प्रत्येक क्षणी योग्य निर्णय घेऊन वेळोवेळी आपल्या या कौशल्याची चुणूक दाखवत असते.युक्तीने च ती दिवसभराच्या दगदगीतून स्वतः साठी थोडा वेळ निश्चित काढून आपला छंद ही पूर्ण करते.अशा सर्व स्त्रियांना नवरात्रीनिमित्त मनापासून प्रणाम.

श्रीमती जयश्री कोकीळ (क्षीरसागर)